cmyk

## संपादकीय

### तुम्ही जनतेचे नोकरच!

एखाद्याला 'लोकप्रतिनिधी' ही बिरुदावली प्राप्त होते ती जनतेने घातलेल्या मतांच्या भिकेमुळे! जनतेने पाठबळ दिल्यामुळेच तुम्ही लोकप्रतिनिधी सभागृहात बसू शकता. तेथे तुम्ही जनतेची गा-हाणी मांडायची असतात. लोकांची कामे मार्गी लावणे हे तुमचे कर्तव्य असते. तुम्ही पाच वर्षे चांगल्या प्रकारे काम केले तर जनता तुम्हालाच पसंती देते. याचाच अर्थ असा की जनता तुमची मालक आणि तुम्ही जनतेचे सेवक, नोकर. तेव्हा यात कमीपणा मानण्याचे काही कारण नाही. जनतेची सेवा करण्यासाठी तुम्हाला सोयी-सुविधा मिळतात. काही लोक मिळालेल्या संधीचे सोने करतात तर काही जण वेगळ्या अर्थाने स्वत:चे 'सोने' करतात.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२५७ | गुरूवार, दि.९ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# हमीभावाने सोयाबीन खरेदीला ८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

## सोयाबीन उत्पादकांसाठी खूशखबर!

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात सुरुवातीपासूनच सोयाबीन खेरदीतील अडचणी कायम आहेत. त्यामुळे नोंदणी झालेल्या केवळ २७ टक्के शेतकऱ्यांचेच सोयाबीन खरेदी झाले. तसेच एकूण उद्दीष्टाच्या केवळ २९ टक्के खरेदी झाली. त्यामुळे सोयाबीन खरदीला मुदतवाढ देण्याची मागणी शेतकरी करत होते. सरकारने शेतकऱ्यांच्या मागणीनुसार**




**सोयाबीन खरेदीला ८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी अ‍ॅग्रोवनला सांगितले. पण खरेदीतील अडचणी अद्यापही कायम आहेत. या अडचणी सोडवल्या नाहीत तर वाढवलेल्या मुदतीतही खरेदी शक्य होणार नाही, असे खरेदी केंद्र चालकांना सांगितले.**

राज्यातील सोयाबीन खरेदी १५ ऑक्टोबरपासून सुरु झाली. 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'च्या ५६२ केंद्रांवर खरेदी सुरू आहे. ६ जानेवारीपर्यंत सोयाबीन खेरदीसाठी नोंदणी सुरु होती. अंतिम तारखेपर्यंत राज्यातील ७ लाख ४४ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केली. त्यापैकी जवळपास २ लाख १० हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात आले. म्हणजेच नोंदणी केलेल्या एकूण शेतकऱ्यांपैकी केवळ २७ टक्के शेतकऱ्यांचे सोयाबीन खेरदी झाले. तसेच शेतकऱ्यांकडून आजअखेर ४ लाख २६ हजार ८७ टन सोयाबीन खरेदी झाली. राज्यात १४ लाख १३ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट आहे. म्हणजेच एकूण उद्दीष्टाच्या केवळ २९ टक्के खरेदी पूर्ण झाली. राज्यातील सोयाबीन खरेदीत अनेक अडचणी आहेत. बारदाणा नसल्याने बहुतांशी केंद्रांवर खरेदी बंद आहे. त्यामुळे खरेदीच्या शेवटच्या तारखेपर्यंत खरेदी वाढणे मुश्कील होते. सध्याची खरेदीची गती पाहता मुदतीत खरेदी होणे शक्यच नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरेदीची मुदत वाढविण्याची मागणी केली होती. सध्याच्या गतीनुसार नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी पान २ वर

### खरेदीतील अडचणी कायम

सरकारने सोयाबीन खरेदीला २७ दिवसांची मुदतवाढ दिली. मात्र आजही खेरदीतील अडचणी कायम आहेत. त्यात बारदाणा नसल्याने खरेदी ठप्प झाली आहे. सरकारने खेरदीतील अडचणी सोडवल्या नाहीत तर दिलेल्या मुदतवाढीतही सोयाबीन खरेदी शक्य होणार नाही, असे काही खरेदी केंद्र चालकांना सांगितले.

# नागपूरनंतर मुंबईतही 'एचएमपीव्ही'ची एन्ट्री



**मुंबई । प्रतिनिधी**

चीनमध्ये थैमान माजवणाऱ्या एचएमपीव्ही व्हायरसचे रुग्ण आता भारतातही समोर येत आहेत. कालच नागपुरात दोन रुग्णांची नोंद करण्यात आली. याला चोवीस तास उलटत नाहीत तोच मुंबईतही एका सहा महिन्यांच्या बाळाला एचएमपीव्ही विषाणूचा संसर्ग झाल्याची माहिती समोर आली आहे. मुंबईतील एका सहा महिन्यांच्या मुलीला या व्हायरसची बाधा झाली होती. तिच्यावर मुंबईच्या हीरानंदानी रुग्णालयात उपचार करण्यात आले. १ जानेवारीपासून ती रुग्णालयात दाखल होती. उपचारानंतर तिला रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे.

दरम्यान, नागपूरमध्ये या विषाणूच्या पान २ वर

# संतोष देशमुखांच्या आरोपींना माफी नाही-मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना सोडणार नाही. त्यांना कठोरातील कठोर शिक्षा करण्यात येईल जेणेकरून गुन्हेगारांना एक संदेश मिळेल असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देशमुख कुटुंबीयांना दिला. संतोष देशमुख प्रकरणात जे कुणी गुन्हेगार असतील त्यांना माफी नाही. यामागे कुणीही असेल त्याला शिक्षा मिळेल असेही मुख्यमंत्र्यांनी पान २ वर

### काय म्हणाले मुख्यमंत्री?

या हत्येमागे कुणीही आरोपी असो, त्याला सोडणार नाही. तसेच यातून महाराष्ट्रातील गुन्हेगारी प्रवृत्तीला एक उदाहरण दिले जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी निर्घुण हत्या करण्यात आली होती. पवनचक्की खंडणीप्रकरणामध्ये ही हत्या झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात आतापर्यंत पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडवर खंडणी प्रकरणाशी संबंधित गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी

संतोष देशमुख हत्या प्रकरणात भाजपचे आ.सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मिक कराडवर थेट आरोप केले आहेत. त्याचसोबत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके, शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर, खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी वाल्मिक कराड हाच यामागे असल्याचा आरोप केला. त्याच पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशीही मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणातील आरोपींवर मोक्का लावण्यात यावा अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे. तसेच वाल्मिक कराड आणि त्याच्या गुंडांची कोट्यवधी रुपयांची बेनामी संपत्ती असून त्याची ईडीने चौकशी करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## सहा गावात टक्कल पडण्याचे प्रमाण वाढले

बुलडाणा : शेगाव तालुक्यातील सहा गावांतील गावकऱ्यांच्या केसाची जलद गतीने गळती होऊन टक्कल पडण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे हजारो आबाल-वृद्ध गावकरी धास्तावले असून आरोग्य यंत्रणा बुचकळ्यात पडली आहे.

केंद्रीय आरोग्य, आयुष, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलडाणा लोकसभा मतदारसंघातील या प्रकाराची आरोग्य यंत्रणांनी गंभीर दखल घेतली आहे. शिवसेना शिंदे गटाचे शेगाव तालुका प्रमुख रामेश्वर थारकर यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर गिते यांना निवेदन देऊन या गंभीर बाबीची दखल घेत गावांमध्ये उपचार व मार्गदर्शन शिबिर आयोजित पान २ वर

# स्व.देशमुख खून प्रकरणी सरपंच परिषदेचे आझाद मैदानात धरणे आंदोलन

## प्रदेशाध्यक्ष काकडे यांच्या नेतृत्वात राज्यभरातील सरपंच एकवटले

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात गाजत असलेल्या केज तालुक्यातील मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्या प्रकरणी सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र च्या वतीने आझाद मैदानात परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या नेतृत्वात एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले यात राज्यभरात मोठ्या संख्येने सरपंच



सहभागी झाले या धरणे आंदोलनात खालील मागण्या करण्यात आल्या त्यात प्रामुख्याने स्व.देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील पान २ वर

# राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या काही वर्षांपासून अनेक इंग्रजी माध्यमांच्या तसेच विविध बोर्डाच्या शाळांकडून मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ केली जात होती. तसेच नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय पर्यायी करण्यात आल्याची चर्चा रंगली होती. आता शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मराठी अनिवार्यच अशी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक असणार आहे, अशी माहिती दादा भुसे यांनी दिली आहे.**

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शालेय शिक्षण विभागाबद्दल काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यात त्यांनी शिक्षण विभागाची पुढील वाटचाल कशी असेल, त्यासाठी काय करावे लागेल याबद्दल विविध पान २ वर

### इंग्रजी बोर्डाच्या शाळांनाही नियम लागू

इंग्रजी भाषा आवश्यक असली तरी राज्यात मराठी भाषा महत्त्वाची आहे. आता या भाषेला केंद्राकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक आहे. मात्र तरी काही शाळा यातून पळवाट काढत आहेत. अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याच्या तक्रारीही येत आहेत. आता राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचा कायदा करण्यात आला आहे. यामुळे खासगी, सीबीएससी, आयसीएससी किंवा कोणत्याही इंग्रजी बोर्डाच्या शाळांना हा नियम लागू असणार आहे. त्यानुसार मराठी भाषा शिकवली गेलीच पाहिजे, अशा सूचना दादा भुसे यांनी केल्या आहेत.

# ना.मुंडे, आ.धसांसह पस्तीस आमदारांच्या निवडीला हायकोर्टात आव्हान

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पराभूत झालेल्या उमेदवारांनी विजयी उमेदवारांच्या निवडीस आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केल्या आहेत. निवडणूक याचिका दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस होता.

विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यापासून आम्ही पान २ वर

### अहिल्यानगर जिल्ह्यातून आठ याचिका

अहिल्यानगर जिल्ह्यातून आठ जणांनी निवडणूक याचिका दाखल केल्या आहेत. यात संगमनेरचे आमदार अमोल खटाव यांच्याविरुद्ध बाळासाहेब थोरात, कर्जतचे आमदार रोहित पवार यांच्याविरुद्ध राम शिंदे, अहमदनगरचे आमदार संग्राम जगताप यांच्याविरुद्ध अभिषेक कळमकर, शेगावच्या आमदार मोनिका राजळे यांच्याविरुद्ध अ‍ॅड. प्रताप ढाकणे, राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्याविरुद्ध प्राजक्त तनपुरे, अकोलेचे आमदार डॉ. किरण लहामटे यांच्याविरुद्ध अमित भांगरे, पारनेरचे आमदार काशीनाथ दाते यांच्याविरुद्ध राणी लंके यांनी आणि कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्याविरुद्ध संदीप वरपे यांचा समावेश आहे.

# हत्येच्या दोन दिवस आधी आ.सुरेश धस वाल्मीक कराडच्या संपर्कात-अमोल मिटकरी

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. सुरेश धस यांच्या आक्रमक भूमिकेला आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जशास तसे उत्तर दिले आहे. राष्ट्रवादीचे नेते अमोल मिटकरी यांनी सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे आता हे प्रकरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरण भाजप आमदार सुरेश धस यांनी लावून धरलं आहे. वाल्मीक कराडच्या माध्यमातून धस यांनी धनंजय मुंडेंना लक्ष केलं होतं. त्यानंतर आता आमदार अमोल मिटकरी यांनी सुरेश धस यांच्याबाबत खळबळजनक दावे केले आहेत. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीमध्ये संतोष देशमुख पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.८ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,८९० | ३,६११ | ३,१४९ |
| ज्वारी/हायब्रिड: २५.०० क्विंटल | १,९०१ | २,८०० | २,२२२ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १७५.०० क्विंटल | ४,४०० | ७,६६३ | ७,२८७ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ५,४१० | ६,७०० | ६,०५५ |
| बाजरी: ६.०० क्विंटल | २,४५१ | ४,३०० | ३,६८३ |
| मुग : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| सोयाबीन: १०४.०० क्विंटल | ४,०७५ | ७,४०० | ४,६४३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,३०० | ५,४०० | ४,८५० |

# युवकांनो... 'ड्रग्स फ्री' समाज घडविण्यासाठी सैनिक म्हणून पुढे या-मुख्यमंत्री

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाचे उद्‌घाटन

**ठाणे । प्रतिनिधी**

**देशाचे आणि समाजाचे नुकसान करीत असलेल्या न दिसणाऱ्या शत्रूशी लढण्यासाठी समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. ड्रग्स व तत्सम अंमली पदार्थांच्या माध्यमातून काही लोक समाज पोखरण्याचे दुष्कर्म करीत आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी सजग राहा, सैनिक म्हणून पुढे या. हीदेखील एक प्रकारची देशभक्ती आणि समाजाची सेवा आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आयोजित नवी मुंबई, वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाचे उद्घाटन**




**संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.**

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, प्रख्यात अभिनेता आणि 'नशामुक्त नवी मुंबई' या उपक्रमाचे आयकॉन जॉन अब्राहम, आमदार मंदा म्हात्रे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे, प्रशांत मोहिते, रश्मी नांदेडकर, संजयकुमार पाटील, महाविद्यालयीन विद्यार्थी, नशामुक्तीचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आदी उपस्थित होते. या मूकनाट्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तर या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते ''नशामुक्त नवी मुंबई'' अभियानाच्या चित्रफितीच्या प्रकाशनाने संपन्न झाले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस पुढे म्हणाले की, ड्रग्समुळे स्वतःच्या आयुष्यासोबत आपण देशाचेही नुकसान करतो हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रवाहासोबत जाणारे अनेक असतात, परंतू चांगले करण्यासाठी प्रवाहाविरुद्ध जावे लागते, त्यासाठी शारीरिक ताकदीपेक्षा मानसिक ताकद गरजेची आहे. ''नशामुक्त नवी मुंबई'' हे अभियान अतिशय महत्वाचे आहे. गृह खात्याच्या पहिल्याच बैठकीत पोलिसांना सांगितले की, आपल्याला ड्रग्स विरुद्ध मोठी लढाई लढायची आहे. सरळ लढाई करता येत नाही म्हणून अंमली पदार्थांच्या देश पोखरण्याचा प्रयत्न केला जातोय. ते म्हणाले, देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी गृह विभागासंबंधी घेतलेल्या बैठकीत कॅनडाचे उदाहरण दिले. ड्रग्जमुळे कॅनडा सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडून पडला. मात्र भारत ड्रग्जविरूद्धची ही लढाई जिंकू शकतो. देशातील सर्व राज्यांनी एकमेकांना सहकार्य करीत ही लढाई एकत्र लढायला हवी. सर्वांनी एकत्र येवून संपूर्ण भारत ड्रग्स मुक्त करायचा आहे, हा आपला निर्धार असायला हवा. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून जाहीर करण्यात आलेल्या ८८२८ ११२ ११२ या टोल फ्री क्रमांकाचा प्रभावी वापर करा. शेवटी श्री.फडणवीस यांनी नशामुक्तीसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल नवी मुंबई पोलीस दलाचे अभिनंदन केले. तसेच सेलिब्रिटी पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# तुम्ही जनतेचे नोकरच!

एखाद्याला 'लोकप्रतिनिधी' ही बिरुदावली प्राप्त होते ती जनतेने घातलेल्या मतांच्या भिकेमुळे! जनतेने पाठबळ दिल्यामुळेच तुम्ही लोकप्रतिनिधी सभागृहात बसू शकता. तेथे तुम्ही जनतेची गा-हाणी मांडायची असतात. लोकांची कामे मार्गी लावणे हे तुमचे कर्तव्य असते. तुम्ही पाच वर्षे चांगल्या प्रकारे काम केले तर जनता तुम्हालाच पसंती देते. याचाच अर्थ असा की जनता तुमची मालक आणि तुम्ही जनतेचे सेवक, नोकर. तेव्हा यात कमीपणा मानण्याचे काही कारण नाही. जनतेची सेवा करण्यासाठी तुम्हाला सोयी-सुविधा मिळतात. काही लोक मिळालेल्या संधीचे सोने करतात तर काही जण वेगळ्या अर्थाने स्वत:चे 'सोने' करतात. काही जण घोटाळे करून स्वत:चे घर भरतात आणि उजळ माथ्याने फिरतात. 'उडदामाजी काळे-गोरे' असणारच! निवडणुका लागल्या की जनतेची सेवा करण्यासाठी इच्छुक मंडळी जनतेच्या दारी मतांची भीक मागतात,

त्यासाठी लोटांगणही घालतात, आश्वासने देतात, मोठमोठ्या सभा घेतात, कॉर्नर बैठका घेतात, जनतेला मतदार राजा असे संबोधतात. मतदार राजाने एकदा का भीक घातली की निवडून आलेली प्रजा सरड्यासारखे रंग बदलते! निवडून येण्यापुरते जनतेला मालक संबोधणारी मंडळी, निवडून आल्यानंतर स्वत:ला मालक आणि जनतेला नोकर समजू लागते. पाच वर्षांसाठी सत्ता मिळाल्याने, खुर्ची पक्की झाल्याने काहीही बोलण्याची, बरळण्याची आपल्याला मुभा आहे असे त्यांना वाटू लागते. यासंबंधीची असंख्य उदाहरणे देता येतील. सध्या दिल्ली विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. दिल्लीतील कालकाजी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार रमेश बिधुरी यांनी काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांच्याबाबत केलेल्या एका वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे.

कालकाजीमधील रस्ते प्रियंका गांधी यांच्या गालासारखे गुळगुळीत बनवू असे वक्तव्य बिधुरी यांनी केले. ते पुढे म्हणाले, लालू प्रसाद यादव यांनी बिहारचे रस्ते हेमामालिनी यांच्या गालाप्रमाणे गुळगुळीत करण्याचे आश्वासन दिले होते परंतु लालू आश्वासन पूर्ण करू शकले नाहीत. मी तुम्हाला आश्वासन दिले आहे ते पूर्ण करीन असे बिधुरी म्हणाले. रमेश बिधुरी यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांच्या आडनावावरून टीका केली होती. त्यावरून आतिशी यांना पत्रकार परिषदेत रडू कोसळले होते. बिधुरी यांच्या टीकेला उत्तर देताना आतिशी म्हणाल्या, आपले राजकारण एवढे खालच्या स्तरावर कसे जाऊ शकते? १० वर्षे खासदार असताना बिधुरी यांनी कालकाजीसाठी काय काम केले ते सांगावे. त्यांनी माझ्या वडिलांना शिवीगाळ करून नव्हे तर त्यांच्या कामाच्या आधारे मते मागावीत. आतिशी यांचे म्हणणे योग्य असले तरी रमेश बिधुरी नक्कीच तसे काही करणार नाहीत, कारण त्यांच्यासमोर त्यांचे सर्वेसर्वा नरेंद्र मोदी यांचा आदर्श आहे.

पंतप्रधान मोदी दहा वर्षांत आपण काय केले ते सांगत नाहीत, उलट साठ वर्षांत काँग्रेसने काय केले? असा सवाल करतात. आता काहीही बरळण्याचे दुसरे उदाहरण. शिर्डीतील साईबाबा संस्थानने मोफत जेवण बंद करावे आणि हे पैसे मुलांच्या भवितव्यासाठी, शिक्षणासाठी खर्च करावेत. साईबाबा मंदिरात मोफत जेवण मिळत असल्याने महाराष्ट्रातील भिकारी शिर्डीत गोळा झाले आहेत, असे अपमानजनक वादग्रस्त वक्तव्य भाजपनेते, माजी खासदार सुजय विखे-पाटील यांनी केले आहे. शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी रोज देशभरातून हजारो भाविक येत असतात. श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणारे साईबाबा देशभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान आहे. हे भाविक श्रद्धेपोटी येतात, मोफत भोजन मिळते म्हणून येत नाहीत. देशातील भिकारी येथे येऊन जेवतात असे म्हणणे हा साईभक्तांचा अपमान आहे. अन्नदान हे चांगले काम, पुण्यकाम मानले जाते. त्याचा अपमान करणे योग्य नाही.

उलट अशा उपक्रमाचे कौतुक झाले पाहिजे. तिरुपती बालाजी मंदिरात कित्येक वर्षांपासून असा उपक्रम सुरू आहे. लोकांनी निवडून दिले म्हणजे 'उचलली जीभ की लावली टाळूला' असे करायचे नसते हे लोकप्रतिनिधींच्या लक्षात कधी येणार? आता तिसरे उदाहरण. बारामतीतील मेदड येथे एका नवीन पेट्रोल पंपाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलत असताना अजित पवार कार्यकर्त्यांवर संतापल्याचे दिसले. अजित पवारांना नागरिकांकडून कामाच्या संदर्भातील निवेदने दिली जात होती. निवेदने स्वीकारून अजित पवार कामे मार्गी लावण्याच्या सूचना अधिका-यांना देत होते. त्याच वेळी एका कार्यकर्त्याने अनेक कामे झाली नसल्याचे म्हटले. त्यानंतर काही नागरिकांनीही त्याचीच री ओढली अन्? रोखठोक स्वभावासाठी प्रसिद्ध असलेले अजित पवार संतापले आणि म्हणाले, अरे तुम्ही मला मते दिली म्हणजे माझे मालक नाही झालात.

मला सालगडी केलंय का? अनेक वेळा थेट व्यासपीठावरून कार्यकर्त्यांना खडसवणारे अजित दादा संतापले असले तरी त्यांनी शांत डोक्याने विचार केला तर त्यांच्या लक्षात येईल की, जनता तुमची मालकच आहे आणि तुम्ही त्यांचे सालगडीच आहात. पाच वर्षांनंतर तुम्हाला पुन्हा त्याच पदावर (सालगडी) ठेवायचे की नाही हे जनताच ठरवते. तेव्हा उतू नका, मातू नका, घेतला वसा टाकू नका. जनतेने तुमच्याकडे पाणी देण्याची मागणी केली तेव्हा तुम्ही काय म्हणालात? हजारो कोटींचा सिंचन घोटाळा झाला तरी जनता शांतच राहिली. तुमचे अपराध तिने पोटात घातले. मालकच नोकराला माफ करत असतो. त्याच्यासमोर आपला रुबाब दाखवायचा नसतो. मालकानेच तुमच्या उदरभरणाची सोय केली आहे हे विसरू नका.

# 'रोड रेज'चा वाढता धोका!



**रस्ते अपघातात होणारी हानी जितका मोठा चिंतेचा विषय आहे त्या पेक्षा अधिक गंभीर विषय म्हणजे 'रोडरेज' अर्थात रस्त्यावर होणारी वाहनधारकांमधील भांडणे हा आहे. रस्ते अपघातात होणाऱ्या प्राणहानी आणि वित्तहानी पलीकडे अधिक हानीचा धोका 'रोड रेज' मधून आहे. या प्रकारच्या रागाच्या प्रदर्शनातून हाणामारी पासून दंगलीपर्यंत उदाहरणे आहेत, अशा घटना रस्त्याची शिस्त तर बिघडवितात, सोबत समाज जीवनावर देखील याचा परिणाम होत असतो.**

रोड रेज च्या बाबत,कारण अगदी किरकोळ असतं पण होणारा गोंधळ आणि राडा खूप मोठा असतो... हॉर्न का वाजवला ? धक्का का दिला ? साईड का नाही दिली अशा स्वरूपाच्या किरकोळ कारणांवरून रस्त्यात धक्का-बुक्की पाहून मारामारी, वाहनाच्या काचा फोडणे प्रसंगी वाहन पेटवून देणे असे प्रकार घडतात. रोड रेज आणि वाहतूक याचा तसा दार्शनिक असा संबंध दिसत असला तरी यामागे मुळ कारण असतं ते मानवी स्वभाव आणि मानवी अहंकार यामागे काही प्रमाणात रस्त्यात वाहतुक कोंडीत खूप काळ अडकावे लागले तर वाहनचालक आपले मानसिक संतुलन गमावतात आणि ''वड्याचे तेल वांग्यावर'' व्हावं तसा काहीसा प्रकार रस्त्यावर होणाऱ्या या रागाच्या घटनातून समोर येतो. अर्थात या रागामागे त्राग्याचे कारण नक्की असते. रोड रेजचे प्रकार शहरागणिक बदलताना आपणास दिसतात. ज्या महानगरात अधिक वाहतूक आहे आणि सिग्नल यंत्रणा आहे अशा शहरात सिग्नल यंत्रणेचा वेळ आणि गर्दी याची वाहनधारकांना सवय झालेली असते आणि आपल्याला इथं वाट बघण्याखेरीज पर्याय नाही अशी मानसिक तयारी देखील झालेली असते त्यामुळे महानगरात असे प्रकार आभावानेच घडतात. छोटया शहरांमध्ये काहीसा वेगळा अनुभव आपणास घेईल अशा ठिकाणी वाहतूक शिस्त, एकेरी मार्ग वाहतूक आदी धाब्यावर बसवून वाहने हाकण्याची एक प्रकारची स्पर्धा आपणास दिसते. अशा भागात मोठा आवाज करणारे प्रेशर हॉर्न (भोंगे) तसेच फटाके वाजविणारे सायलेन्सर आदी वापरण्याची स्पर्धा युवकांमध्ये दिसते. यावर नियंत्रण नसेल तर मात्र रोड रेज चा प्रकार हमखास दिसतो. ज्या भागात वाहतुकीची शिस्त नाही किंवा शिस्त काय आहे हे माहिती नाही अशा भागातील वाहनचालक महामार्गावर देखील त्याच पद्धतीने वागण्याचा प्रयत्न करतात आणि या स्पर्धेतून रोड रेज व त्यापुढील गंभीर प्रकार घडताना दिसतात. आपला राज्यात छोटया गावात केवळ रोडरेजमुळे जमाव गोळा करून मारामारी व पुढे दंगल त्यातून संचारबंदी असे प्रकार घडलेले आपण बघितले आहेत. रस्ता हा केवळ आपला नाही. ज्याला घाई आहे त्याला प्राधान्य द्यायला हवे, कुणी जाणीवपूर्वक धक्का देत नाही. हे समजून घ्यायला हवे. वाहनाच्या ब्रेक पेक्षा मनाचा ब्रेक लावायला हवा तरच रोडरेज' कमी होईल.

**प्रशांत विजया अनंत दैठणकर**

# बीड जिल्हास्तरीय शिक्षक पुरस्कार सोहळा संपन्न

## दिव्यांग कर्मचाऱ्यांचा समाजकल्याणतर्फे पुरस्कार देऊन सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सभागृह येथे दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा उत्कृष्ठ सेवेबद्दल आदर्श कर्मचारी म्हणून सन्मान करण्यात आला.**



सर्वसाधारण मुले हि जवळच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षण घेऊ शकतात,परंतु विशेष गरजा असणारी बालके यांच्यासाठी दिव्यांग आयुक्तालय पुणे आणि दिव्यांग मंत्रालय मुंबई यांच्या वतीने विशेष शाळांची निर्मिती करून या शाळांचे नियंत्रण जिल्हा समाजकल्याण कार्यालय यांच्या मार्फत अंमलबजावणी करण्यात येते.या शाळा निवासी प्रकारात येत असून यामध्ये मूकबधिर,अस्थिव्यंग,अंध,मतीमंद प्रवर्गातील मुले आपले यशस्वीरित्या शिक्षण घेत आहेत.त्याकरिता या शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे आपली अविरतपणे सेवा बजावत आहे.हा दिव्यांग प्रवर्ग समाजामध्ये एक दुर्लक्षित प्रवर्ग मानला जातो,या विद्यार्थ्यांना समाजामध्ये आपले आस्तित्व निर्माण करण्यासाठी हे कर्मचारी आपल्या जीवाची बाजी लावताना आपल्याला दिसून येतात.या त्यांच्या कार्याची दखल घेऊन जिल्हा समाजकल्याण कार्यालय बीड यांच्या वतीने दिव्यांग शाळामधील उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जिल्हास्तरीय पुरस्कार देण्याचा महाराष्ट्रामधील एकमेव अभिनय उपक्रम राबला आहे.याच अनुषंगाने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये हे पुरस्कार मा.श्री.वासुदेवराव सोळंकी (अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जी.प.बीड ) तसेच मा.श्रीम.मेश्राम एस.एन.(जिल्हा समाजकल्याण अधिकारी बीड )यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील श्री.लक्ष्मीकांत कुलकर्णी (आयुर्मंगालाम विद्यालय बीड )श्री.विनोद खडके (अस्थिव्यंग विद्यालय नेकनूर )श्री.खंडू भुजबळ (आयुर्ममंगलम विद्यालय बीड)श्री.विजय जाधव (कै.केशवराव धांडे मतीमंद विद्यालय तलवाडा)श्री.शेख आलीम (मानव विकास अपंग विद्यालय अंबाजोगाई ) श्री.अनिल शिंदे (मतीमंद विद्यालय उमरी केज)श्री.विठ्ठल मस्के (रुक्माई गोविंद विद्यालय बीड) श्री.राहुल गवळी (प्रज्ञाचक्षु अंध विद्यालय बीड) या कर्मचाऱ्यांना आदर्श कर्मचारी म्हणून शाल,श्रीफळ,आणि मानचिन्ह देऊन गौरण्यात आले आहे. जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो परंतु महाराष्ट्रामध्ये कोठेच दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जात नाही त्याची सुरवात मा.वै.सा.का.श्री.नखाते साहेब यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात प्रथमच बीड जिल्ह्यामध्ये सुरु करण्यात आली आहे.यामुळे दिव्यांग क्षेत्रामध्ये कार्य करण्याऱ्या कर्मचाऱ्यास नक्कीच प्रेरणा मिळून आपले काम अति उत्कृष्ट करण्याचे ध्येय या कर्मचार्यासमोर असेल असे वक्तव्य आपल्या भाषणातून श्री.नखाते सर यांनी व्यक्त केले,तसेच या कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण शिक्षकाप्रमाणे पुरस्कार व लाभ देण्याची मी शिफारस प्रशासनाकडे करणार असल्याचे श्रीम.मेश्राम यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.भोंडवे सर यांनी केले तर आभार श्री.अशोक चव्हाण यांनी मानले.

## पान १ वरून...

### हमीभावाने सोयाबीन खरेदीला

करण्यासाठी आणखी किमान २ महिन्यांची मुदत देण्याची मागणी खरेदी केंद्रांनी केली होती. खरेदीला मुदत देण्याची मागणी विचारात घेऊन सरकारने सोयाबीन खरेदीला ८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

-------------

### संतोष देशमुखांच्या आरोपींना

आश्वासित केल्याची माहिती धनंजय देशमुख यांनी दिली. संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली आणि न्याय मिळावा अशी मागणी केली. यावेळी त्यांच्यासोबत भाजपचे आमदार सुरेश धस होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर संतोष देशमुखांचे भाऊ धनंजय देशमुख म्हणाले की आमच्याकडे काही गोष्टी आणि पुरावे होते ते मुख्यमंत्र्यांना दाखवले, त्यावर चर्चा केली. आमची भूमिका ही न्यायाची आहे. आम्हाला फक्त न्याय हवा. निपक्षपातीपणे तपास झाला पाहिजे. या मागे कुणीही असेल त्याला शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी आम्ही केली. एफआयआरमध्ये ज्या काही गोष्टी आहेत, त्यामधील सर्वांचे सीडीआर तपासावे अशी मागणी आम्ही केली.

----------------

### नागपूरनंतर मुंबईतही

संसर्गाचे दोन नवीन रुग्ण आढळले आहेत. देशभरात आतापर्यंत सात जणांना या विषाणूचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. मात्र, केंद्र सरकारने सांगितले आहे की या प्रकरणांमध्ये वाढ झाली तरी कोविडसारखी परिस्थिती उद्भवणार नाही. बंगळुरू, नागपूर आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी दोन, तर अहमदाबादमध्ये एक रुग्ण नोंदवला गेला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला आवाहन केले आहे की एचएमपीव्हीविषयी घाबरण्याची गरज नाही. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की हा विषाणू नवीन नाही; तो यापूर्वीही दिसून आला आहे आणि सध्या तो पुन्हा सक्रिय झाला आहे. लवकरच योग्य ती नियमावली जाहीर केली जाईल. तसेच केंद्र सरकारने राज्यांना यासंदर्भात माहिती पुरविण्याचा निर्णय घेतला असून माध्यमांनी अधिकृत माहितीच प्रसारित करावी, असेही त्यांनी सुचवले. चीनमध्ये थैमान घालणा-या या व्हायरसचे रुग्ण आता भारतातील कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातही आढळले आहेत. नागपूरमध्ये दोन मुलांना या व्हायरसची बाधा झाली असून, देशात आतापर्यंत एकूण सात रुग्ण आढळले आहेत. मात्र, मुंबईतील रुग्णालयात दाखल असलेल्या मुलीला उपचारानंतर घरी पाठवण्यात आले आहे.

----------------

### राज्यातील सर्व शाळांमध्य

घटकांशी चर्चा करत असल्याचे सांगितले आहे. शालेय शिक्षण विभागाचा रोडमॅप लवकरच तयार केला जाईल, असेही ते म्हणाले. त्यातच आता दादा भुसे यांनी मराठी शिकवणे अनिवार्य असल्याचे म्हटले आहे. केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे. यातून त्यांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही. याबरोबरच मराठी भाषेच्या अध्यापनाला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी त्या शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान असायलाच हवे, अशी सूचना दादा भुसे यांनी दिली आहे. दादा भुसे यांनी शालेय शिक्षणमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. यानंतर त्यांनी राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा संस्थाचालक संघटना यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी शालेय शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास व्हावा, यासाठीचे सर्वंकष धोरण आणले जाणार आहे. येत्या आठ दिवसांत शालेय शिक्षण विभागाच्या धोरणाचा रोड मॅप समोर आणला जाईल. शालेय शिक्षण विकासाचा एक दशसूत्री कार्यक्रम जाहीर करून तो राबवला जाईल, असे दादा भुसे म्हणाले. तसेच मराठी भाषेचे अध्यापन करण्यास टाळाटाळ करणा-या इंग्रजी शाळांवर शालेय शिक्षण विभागाची करडी नजर असणार आहे. ज्या शाळा मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ करत असतील, त्याची तक्रार पालकांना करता येणार आहे. तसेच या अशा शाळांवर योग्य ती कारवाई केली जाणार आहे, असेही दादा भुसे म्हणाले.

------------

### स्व.देशमुख खून प्रकरणी सरपंच

आरोपीवर तात्काळ मोक्का अंतर्गत कारवाई करावी.देशमुख यांच्या मारेकऱ्यांना आश्रय देणाऱ्यांना आरोपी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत संतोष देशमुख यांच्या पत्नीला शासकीय नोकरी देण्यात यावी व ५० लक्ष रुपयांची आर्थिक मदत करण्यात यावी. ग्रामपंचायतमध्ये काम करतांना अडथळा निर्माण केल्यास किंवा गुंडगिरी केल्यास सरपंच, उपसरपंच यांना ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची परवनगी द्यावी.हत्येचा तपास पूर्ण होईपर्यंत मा. धनंजय मुंडे यांचा मंत्री पदाचा राजीनामा घ्यावा.सरपंच परिषदेच्या राज्य पदाधिकाऱ्यांसोबत मुख्यमंत्र्यांनी बैठक घ्यावी.या मागण्याचा समावेश होता मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबावर अन्याय झाला आहे त्यांचे कुटूंब लहान मुले पोरकी झाली आहेत. ग्रामविकासात काम करत असतांना अशा घटना घडल्या तर गावात काम करणे अवघड होईल, मात्र या प्रकरणाने सरपंच बांधवात कमालीची अस्वस्थता आहे. या प्रकरणी अनेक जिल्हयात सरपंच परिषदेच्यावतीने निवेदने दिली आहेत. रास्ता रोको करण्यात आले आहेत, घटनेचा मास्टर माईंड कोण आहे? याचा शोध घेणे असल्याचे म्हटले या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आ. सुरेश धस रयतक्रांती संघटनेचे अध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शवीला यावेळी परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड विकास जाधव, सरचिटणीस राजाराम पोतनीस, राज्य कोशाध्यक्ष आनंद जाधव, राज्य विश्वस्त शिवाजी आप्पा मोरे, सुधीर पठाडे, सुप्रिया जेधे, कोअर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनावणे, उपाध्यक्ष जे. डी.टेमगिरे,राजमल भागवत, सुषमाताई देसले, राज्य प्रसिद्धी प्रमुख संजय बापू जगदाळे यांच्यासह राजभरातील सरपंच परिषदेचे पदाधिकारी व सरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### सहा गावात टक्कल पडण्याचे

करण्याची मागणी केली. तसेच ना. प्रतापराव जाधव यांच्याशीही फोनवरून संपर्क साधून या गंभीर बाबीबाबत अवगत केले. यामुळे नामदार जाधव यांनीही यात लक्ष घातले आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा ॲक्शन मोडवर असल्याचे चित्र आहे. शेगाव तालुक्यातील भानखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर बालाजी अट्रट हे स्वत: त्वचारोगतज्ज्ञ आहेत. हे नमुने तपासणीसाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात येणार असल्याचे आरोग्य यंत्रणेच्या वरिष्ठ सूत्रांनी ही माहिती दिली. अगोदर डोके खाजवणे, नंतर सरळ केस हाती येणे आणि तिस-या-चौथ्या दिवशी चक्क टक्कल पडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शाम्पूने असा प्रकार घडत असावा असे काहींचे मत असले तरी आयुष्यात शाम्पू न वापरणा-या नागरिकांचेही केस जात असल्याने नागरिकांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे. शेगाव तालुक्यातील गोंडगाव कालवळ व हिंगणा वैजनाथ या गावांमध्ये केस गळतीचे प्रमाण आढळून आले. तालुका आरोग्य प्रशासनाने सर्वेक्षण केले असून पाण्याचे नमुने घेण्यात आले आहेत.

------------

### ना.मुंडे, आ.धसांसह पस्तीस

घेतलेल्या आक्षेपांची निवडणूक आयोगाने दखल घेतली नाही, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. मतदार यादीतून वगळण्यात आलेली आणि नव्याने समाविष्ट केलेली नावे, प्रचारादरम्यान तसेच मतदान प्रक्रिया सुरू असताना झालेला आचारसंहितेचा भंग आणि मतमोजणी प्रक्रियेबाबत याचिकाकर्त्यांनी आक्षेप नोंदविले आहेत. निवडून आलेल्या उमेदवारांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याने त्यांची निवड रद्द करण्यात यावी, अशी त्यांची मागणी आहे.

**कोणाविरुद्ध कोणी दाखल केली याचिका?**

औरंगाबाद पश्चिम मतदारसंघातून विजयी झालेले संजय शिरसाट यांच्या विरोधात राजू शिंदे, परळीतून विजयी झालेले धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध करुणा मुंडे, आष्टीचे आमदारसुरेश धस यांच्याविरुद्ध महेबूब शेख, घनसावंगीचे आमदार हिकमत उढाण यांच्याविरुद्ध राजेश टोपे, बदनापूरचे आमदार नारायण कुचे यांच्याविरुद्ध बबलू चौधरी, भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांच्याविरुद्ध चंद्रकांत दानवे, परांडा येथील आमदार तानाजी सावंत यांच्याविरुद्ध राहुल मोटे, जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांच्याविरुद्ध कैलास गोरंट्याल, लातूरचे आमदार रमेश कराड यांच्याविरुद्ध सर्जेराव मोरे, केजच्या आमदार नमिता मुंदडा यांच्याविरुद्ध पृथ्वीराज साठे, उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांच्याविरुद्ध सुधाकर भालेराव, वसमतचे आमदार राजू नवघरे यांच्याविरुद्ध जयप्रकाश दांडेगावकर, अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील यांच्याविरुद्ध विनायकराव पाटील, धुळे जिल्ह्यातील साक्रीच्या आमदार मंजुळा गावीत यांच्याविरुद्ध प्रवीण चौरे, पारोळाचे आमदार अमोल पाटील यांच्याविरुद्ध सतीश पाटील

------------

### हत्येच्या दोन दिवस आधी आ.सुरेश धस

यांच्या हत्येआधी दोन दिवस सुरेश धस हे वाल्मीक कराडचा संपर्कात होते असा खळबळजनक आरोप अमोल मिटकरी यांनी केला आहे. धस यांच्यावर खंडणी, हत्या, जमीन बळकावणे यासारखे आरोप असून त्यांची यादी मोठी असल्याचं मिटकरी यांनी म्हटलं. धस यांच्याशी संबंधित प्रकरणातील पुरावे योग्य वेळी बाहेर काढण्याचा इशाराही अमोल मिटकरी यांनी दिला आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष धनंजय मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. स्वतः अजित पवार यांनी सांगितले आहे की, जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागण्याचा प्रश्न येत नाही. संतोष देशमुख यांची ज्या पद्धतीने हत्या झाली त्याचे कोणीही समर्थन करत नाही. धनंजय मुंडे यांनी याबाबत पत्र काढून स्वतः भूमिका स्पष्ट केली होती. जो कोणी आरोपी असेल त्याला शासन झालं पाहिजे अशी मागणी धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. जाणीवपूर्वक लक्ष वळवण्यासाठी विविध मोर्चांमध्ये आरोप केले जात आहेत. धनंजय मुंडे यांना राजकीय द्वेषापोटी टार्गेट करण्यासाठी हे सगळं केलं जात आहे,'' असं अमोल मिटकरी म्हणाले. 'सुरेश धस ऐकायला तयार नसतील तर त्यांच्याबद्दलही बोलण्यासाठी खूप आहे. वाल्मीक कराड आणि सुरेश धस यांच्यात हत्या होण्याआधी दोन दिवसांपूर्वीच संभाषण झालं आहे. त्यांच्या संभाषणाचा ऑडिओ पोलिसांकडे गेल्याची माहिती आमच्याकडे आहे. घटनेच्या दोन दिवस आधीपर्यंत सुरेश धस हे वाल्मीक कराड यांच्या थेट संपर्कात होते. त्यामुळे सुरेश धस यांचीही चौकशी झाली पाहिजे की सगळ्यांची मागणी आहे,'' असंही अमोल मिटकरी म्हणाले. 'परळी तालुक्यात २००१ साली जो दरोडा टाकण्यात आला त्यात १७ दरोडेखोरांच्या अंगावर सुरेश धस मित्र मंडळ असं लिहिलेले टी-शर्ट होते. बीड जिल्ह्यामध्ये सगळ्यांना माहिती आहे कोणी कशाप्रकारे हुकूमत तयार केली. आपण फारच सोज्वळ आहोत असा आव आणण्याची गरज नाही. आपला इतिहास फार चांगल्या पद्धतीने सगळ्यांना माहिती आहे,'' असं देखील अमोल मिटकरी म्हणाले.

------------------

### युवकांनो...'ड्रग्स फ्री समाज

म्हणून जॉन अब्राहम यांच्या कामाबद्दलही कौतुक केले. आणि पुन:श्च एकदा निर्धार करु या नशामुक्तीसाठी लढण्याचा, ''ड्रग्स फ्री नवी मुंबई'' करण्यासाठी सैनिक होण्याचे उपस्थितांना आवाहन केले. अभिनेता जॉन अब्राहम यांनी आपल्या मनोगतात ''नशामुक्त नवी मुंबई'' या अभियानाच्या आयोजनाबद्दल नवी मुंबई पोलिसांचे अभिनंदन करून आपले आयुष्य हे शिस्तमय असावे. आपण आपल्या आचरणाने मित्र परिवारामध्ये आदर्श निर्माण करावा आणि एक उत्तम नागरिक म्हणून जगावे, असे आवाहन उपस्थित युवकांना केले. याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, चांगल्या कामाचा ध्यास, हीच खरी नशा आहे. सर्वांनी चांगल्या कामाचा ध्यास घ्यावा. नवी मुंबई महानगरपालिका सर्व आघाड्यांवर प्रथम क्रमांकावर आहे. तसेच नशामुक्त अभियानातही अव्वल राहील, हा विश्वास आहे. सुरुवातीस नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी आपल्या प्रास्ताविकात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने आतापर्यंत राबविलेल्या विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली.

# शासन निर्णय होऊन सुद्धा घनसावंगीत शेतकऱ्यांना अनुदान मिळेना

**जालना । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी नुकसान भरपाई अनुदान मंजूर करण्यात आलं तसे आदेश जिल्हाधिकारी श्रीकृष्ण नाथ पांचाळ जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना याद्या तत्काळ अपलोड करून पाठवावे परंतु घनसावंगी तहसीलदार यांना विसर पडल्यासारखं दिसून येत आहे तसेच तालुका कृषी विभाग व तहसीलदार या दोघांच्या वादामुळे शेतकऱ्याचे अनुदान लांबणीवर गेला आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे. तसेच अंबड तहसील कार्यालय अंतर्गत काही शेतकऱ्यांना केवायसी करण्यासाठी व्ही के नंबर मिळाला असल्याचे शेतकऱ्याकडून बोलल्या जात आहे अंबड तहसील कार्यालय अनुदान बाबत नंबर एक वर काम चालू आहे.**

घनसावंगी तालुक्यातील शेतकरी गत ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे मोठ्या नुकसानीला सामोरे गेले आहेत. शेतपिकांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे राज्य सरकारने या नुकसानीसाठी अनुदान मंजूर केले. याबाबतचा शासन निर्णय देखील जारी झाला आहे. मात्र, अद्याप नुकसान भरपाईच्या याद्या तयार करण्याचे आणि ऑनलाईन प्रक्रियांचे काम प्रलंबित असल्यामुळे शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत पीकविमा आणि अनुदानाची या दोन्ही रक्कमा मिळालेल्या नाहीत, मागील वर्ष ऑक्टोबर महिन्यात बैठकीत जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी तहसीलदार व कृषी विभाग येणे जबाबदारीने तत्काळ शेतकऱ्यांचे अनुदान संदर्भात याद्या अपलोड करावे असे आदेश पण केले होते पण सदरील आदेशाचे पालन घनसावंगी तहसीलदार यांच्याकडून करण्यात आले त्यामुळे शेतकऱ्याचा अनुदान लांबणीवर गेल्याचे बोलल्या जात आहे. शेतकऱ्यांच्या अग्रीम पीकविमा संदर्भात जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालय बैठक पार पडली होती. यावेळी घनसावंगी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत, अशा ७९ हजार शेतकऱ्यांना पीकविमा कंपनीकडून काही दिवसात अग्रीम पिक विमा रक्कम जमा होईल, असे सांगितले गेले होते. परंतु अद्याप पर्यंत शेतकऱ्यांना पीक विमा अग्रीम देखील मिळालेले नाही. गाव पातळीवर याद्या तयार करण्याचे काम तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्याकडे असते. मात्र, घनसावंगी तहसील विभाग आणि कृषी विभाग यांच्यातील संवाद मध्ये ताळमेळ लागत नसल्यामुळे अभावामुळे नुकसान भरपाईची प्रक्रिया रखडली आहे. जानेवारी महिना सुरु झाला असला तरी याद्यांचा घोळ अद्याप मिटलेला नाही याला फक्त तहसीलदार जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. ०९ जानेवारी २०२५



## मराठी विज्ञान परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे उद्घाटन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मराठी विज्ञान परिषद अंबाजोगाई शाखेचे उदघाटन इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबईचे कुलपती पद्मभूषण डॉ. जेष्ठराज जोशी,अध्यक्ष मराठी विज्ञान परिषद मुंबई यांचे शुभ हस्ते योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ.सुरेश खुरसाळे यांचे अध्यक्षतेखाली सोमवार १३ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रांतर्गत श्रीमती गो.कु.योगेश्वरी कन्या विद्यालय परिसरात होणार आहे या प्रसंगी मराठी विज्ञान परिषदेचे सचिव अ.पां.देशपांडे,मराठी विज्ञान परिषद शाखा संभाजीनगरचे अध्यक्ष रंजन गर्गे,मराठी विज्ञान परिषदेच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश गंभीर,मुंबईच्या मराठी विज्ञान परिषदेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश समेळ,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर हे उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जी.बी.व्यास, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य,सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे, यांच्यासह इतर संचालकांनी केले आहे.

# गेवराईच्या कृषी प्रदर्शनामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ -बदामराव पंडित

### उत्कृष्ठ शेतकऱ्यांचा कृषिरत्न स्व.गणेशराव बेदरे किसान कृषीरत्न पुरस्कार देऊन प्रदर्शनाचा समारोप

गेवराई । प्रतिनिधी

कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकर्यांना शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळते. त्यामुळे, ग्रामीण भागातील शेतकरी समृद्ध होऊन त्यांच्या शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढ होत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बदामराव पंडित यांनी येथे केले.

गेवराई येथील दसरा मैदानावर येथे किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने सुरु असलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या पुरस्कार वितरण सोहळा व समारोप कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर युवा नेते रोहित पंडित, गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, भाऊसाहेब नाटकर,




मनसेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मोटे, पत्रकार सुभाष सुतार, राजेंद्र आतकरे, भाऊसाहेब शिंदे, शिनुभाऊ बेदरे, डॉ. संभाजी जाधव, पत्रकार जुनेद बागवान, भागवत जाधव, विनोद पौळ, यांच्यासह आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून उपलब्ध नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेतकऱ्याने शेती केली पाहिजे. गेवराई शहरातील कृषी प्रदर्शन हे राज्यभरातील शेतकर्यापर्यंत पोहचले असून, दरवर्षी या महोत्सवाचा प्रतिसाद वाढत असून, या कृषी महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. ही, आनंदाची गोष्ट असून, गोरगरीब शेतकर्यापर्यंत कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नवे शेती तंत्र पोहचत आहे. त्यांना शेती क्षेत्रातील नवनवीन प्रयोग पहायला मिळत आहेत. त्यामुळे, गेवराई चे कृषी प्रदर्शनाने महाराष्ट्रात नावलौकिक मिळवला आहे. या प्रदर्शनामुळे आमचे मित्र स्व. गणेश बेदरे यांच्या स्मृतींना उजाळा मिळतो, अशी आठवण ही माजी मंत्री बदामराव पंडित यांनी काढली व त्यांनी गेल्या सोळा वर्षांपूर्वी सुरू केलेला कृषीमोहत्सव महेश बेदरे हे अखंड पणे चालवत आहेत ही आपल्या तालुक्यासाठी कौतुकाची बाब असल्याचे सांगत त्यांनी महेश बेदरे यांचे कौतुक केले. दरम्यान माजीमंत्री बदामराव पंडित व सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कृषिरत्न स्व.गणेशराव बेदरे किसन कृषीरत्न पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक महेश बेदरे, सुत्रसंचालन वैभव निवारे यांनी केले तर शेवटी पत्रकार भागवत जाधव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या शेतकऱ्यांचा पुरस्काराने सन्मान

या प्रदर्शनात सौ. योगिता ज्ञानेश्वर चक्कर कोल्हेर, ज्ञानेश्वर लिंबाजी मुळे पौळाचीवाडी, मुकेश बालाजी सुरपाम, केवीके खामगाव, परमेश्वर सखाराम पुंड रेवकी, परमेश्वर ज्ञानेश्वर शिंदे मन्यारवाडी, सुदर्शन शिवाजीराव घोडके वडगाव ढोक, व्यंकटराव नागोराव जायनुरे मुखेड, सचिन आत्माराम पाटील होळकर लासलगाव, वाल्मीक गर्जे राजूरीमळा व प्रवीण आजबे वाघेरा, या सर्व शेतकऱ्यांना कृषीरत्न स्व.गणेशराव बेदरे किसान कृषीरत्न हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## स्वामी विवेकानंद युवा गौरव पुरस्कार संकल्प संस्थेला जाहीर

वडवणी । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये गेल्या चौदा वर्षापासून कार्यरत असणाऱ्या संकल्प संस्थेला शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल तसेच सामाजिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कामाची दखल घेऊन अनाथ मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या पसायदान सेवा प्रकल्पाच्या वतीने अतिशय प्रतिष्ठित समजला जाणारा स्वामी विवेकानंद युवा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचे वितरण स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीच्या औचित्य साधून रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी सामाजिक क्षेत्रातील इन्फंट इंडियाचे श्री दत्ता बारगजे मामा तसेच शांतीवन चे दीपक काका नागरगोजे डॉ. दत्ता नलावडे ,श्री भरत अण्णा लोळगे श्री



गौतमजी खटोड ,श्री नितीनचंद्र कोटेचा,श्री अशोक खाडे,बंडू गाडीवान संस्थेचे प्रमुख श्री गोवर्धनजी दराडे या मान्यवरांच्या उपस्थितीत ढेकनमोहा ता. जि.बीड येथे श्री.कैलास भागवत चोले व सौ.रेखा कैलास चोले या दांपत्याचा सन्मान करण्यात येणार आहे. या निमित्ताने संकल्प संस्थेवर प्रेम करणाऱ्या आपण सर्वांनी उपस्थित राहावे अशी विनंती करण्यात आली आहे.

## ग्रो ब्रेकर कंपनीची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करा मनसेची मागणी

**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस वाणी येथील दहा शेतकऱ्यांची २०१९-२०२४ या कालावधीत नाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत निवड झाली होती परंतु यातील दाही शेतकऱ्यांच्या शेठ जे काम हे गुजरात मधील ग्रो ब्रेकर कंपनीला देण्यात आले होते मात्र दहा पैकी पाच शेडचे काम अपूर्ण ठेवण्यात आले आहे एका शेठ साठी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आली होती महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे १२ ते १८ लाख अनुदान देण्यात



आले होते मात्र ही संपूर्ण रक्कम उचलून पाच शेडचे काम अपूर्ण ठेवण्यात आले आहे हे शेड उभारल्यानंतर महात्मा फुले विकास महामंडळाचे हप्ते भरण्यात येणार होते मात्र शेडच उभारले नसल्याने कंपनी शेतकऱ्यांना उडवा उडवीची उत्तरे देत आहे त्यामुळे या संपूर्ण कामाची चौकशी व दोषीवर योग्य ती कारवाई करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा अन्यथा मनसे स्टाईलने येणाऱ्या काळात आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकरी सेनेचे राज्य सचिव अमोल दिलीपराव भिसे यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सहा जानेवारी रोजी निवेदनाद्वारे केला

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ कुटे मनसे विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य घुगे मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष खंदारे सदाशिव खंदारे बालाजी खंदारे यांच्यासह इतर पदाधिकारी व संबंधित शेतकरी उपस्थित होते.

## अंबाजोगाईत रस्ता सुरक्षा अभियान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई येथे उपप्रादेशिक कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे उदघाटन उप प्रदेशिक वाहन अधिकारी हर्षल डाके यांच्या उपस्थितीत नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमा अंतर्गत वाहन चालकांचे नेत्र तपासणी, रक्तदान ,शालेय,महाविद्यालयात उद्बोधन कार्यक्रम, सामान्य जनतेस वाहनधारकांना रस्ते वाहतूक नियम समजावून सांगणे आणि इतर बाबींवर भर देण्यात येत असून यात नागरिक विद्यार्थी यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संचलन प्रतिनिधी संघटनेचे अध्यक्ष शरद घनचेकर यांनी तर आभार मोटर वाहन निरीक्षक दुधमले यांनी केले.

यावेळी नव्याने पदभार स्वीकारलेले हर्षल डाके यांचे आर टी प्रतिनिधी संघटनेचे मुकुंद जोशी,अभय जोशी,शरद घनचेकर, सलीम भाई यांनी स्वागत केले. या कार्यक्रमास निरीक्षक आचार्य,रंगवाड,करांडे इतर निरीक्षक, उपनिरीक्षक, कार्यालयीन कर्मचारी प्रतिनिधी, नागरिक उपस्थित होते.




पान ६ वरून...

### पुरस्कारांची थाप कर्मचाऱ्यांना

प्रस्थापित करु शकतो. माणसाला माणसासारखे जगता आले पाहिजे आणि सृजनतेने माणसाला माणसासारखे वागवता आले पाहिजे हे चातुर्य अंगी असेल उत्कृष्टपणे संवाद साधता आला तर प्रत्येकजण शासकीय सेवेतील काम उत्तम प्रकारे हाताळू शकेल असे वक्तव्यही श्रीमती मेश्राम यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास श्री. लांडे,श्री. काळम, श्री. ढोबळे सर्व दिव्यांग संस्थाचे अध्यक्ष, मुख्यध्यापक, सचिव, शिक्षिकेत्तर कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.दिप प्रज्जवलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक, कला शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण विभागाचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुश नखाते यांनी केले. सुत्रसंचलन मुख्याध्यापक सुनिल भोंडवे यांनी तर आभार प्रदर्शन अशोक चव्हाण यांनी केले.

### अखेर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या

करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा व अर्जदार यांना आंदोलनापासून परावृत्त करून प्रकरणात कायदा सविस्तर प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे म्हटले आहे. नयना बोंदार्डे ,अपर आयुक्त ( महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी दि.३०.१२.२०२४ रोजी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या निवेदनाची दखल घेत जिल्हाधिकारी बीड यांना निर्देश दिल्यानंतर दि.६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतनिधी अनुषंगाने बैठक घेऊन एकुण १२ महिन्यांतील २०५ आत्महत्याग्रस्त शेतकरी प्रकरणात १४९प्रकरणे पात्र,१९ प्रकरणे अपात्र व ३७ प्रकरणे प्रलंबित असुन ८३ लाख ५० हजार रुपयांची मदतनिधी वितरीत करण्यात आला आहे.

### वारसदार नसताना मुख्याधिकाऱ्यानी

लावण्यात आले.

सदरिल जागेला निवृत्ती जोगडे यांचे नाव नगरपालिकेत लागल्यानंतर व त्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्यानंतर सदरील जागेला निवृत्ती जोगडे यांची पत्नी कृष्णाबाई निवृत्ती जोगडे यांचे नाव लावणे आवश्यक होते. परंतु तसे न होता बाळासाहेब तुकाराम जोगडे २९ मे २०२४ रोजी सदर जागेला नगरपालिकेचे मुख्याधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगणमत करून त्यांचे नाव लावण्यात आले. विशेष म्हणजे या जागेचे प्रकरण माजलगाव येथील न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना नगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी बाळासाहेब जोगडे यांचे नाव मिळकतीस लावले. त्यांचे नाव कशाच्या आधारे लावण्यात आले याचा खुलासा मुख्याधिकारी यांनी केला नाही,सुनावणी घेतो म्हणून एकही सुनावणी न घेतल्यामुळे व बाळासाहेब जोगडे यांचे लावण्यात आलेली नाव कमी करण्यात यावे या मागणीसाठी नगरपालिकेसमोर विजय जोगडे,गोपाळ पैंजणे, बळेश्वर गरड , मनोज आबुज , सदानंद गायकवाड व नानाभाऊ शेळके उपोषणा बसले आहेत.

### कडा आष्टी आणि

ग्राहक दुसरा पर्याय निवडतात कडा येथे राष्ट्रीयकृत व सहकारी जवळपास १० बॅंका असुन कृषी उत्पन्न बाजार समिती शाळा महाविद्यालय शेतकरी विद्यार्थी विविध योजनेचे अर्ज दाखल करण्यासाठी रेंज नसल्याने अडचणी उभ्या रहात आहेत सर्व व्यवहार जवळपास ऑनलाईन असतात आणि बीएसएनएल मोबाईला रेंज नसते तेव्हा वैतागुन ग्राहक बीएसएनएल पासुन दूर जात आहेत अनेक ठिकाणी अद्यापही ३ रेंज आहे जेव्हा की दुसऱ्या कंपण्या ५ रेंज देत आहेत तात्काळ कडा आणि आष्टी तालुक्यात बीएसएनएलची रेंज पूर्ण क्षमतेने मिळण्यासाठी नविन टॉवरची निर्मिती करावी व ३ चे रुपांतर ४,५ मधे करावे अशा विविध विषयांवर चर्चा करुन निवेदन देण्यात आले या वेळी वैद्यनाथ बॅंक कडा शाखा सल्लागार राजेंद्र शिंदे पत्रकार राजेंद्र तांगडे चेअरमन दिलीपराव परदेशी उपस्थित होते.

## सुभेदार मुरलीधर क्षीरसागर यांचे सैन्यदलातील योगदान अविस्मरणीय : दत्ता कांबळे

### काँग्रेसच्या वतीने सेवापूर्ती निमित्त भारतीय जवानाचा यथोचित सन्मान

माजलगाव । प्रतिनिधी

सैन्य दलात सुभेदार मुरलीधर क्षीरसागर यांचे योगदान अविस्मरणीय आहे, अशा शब्दांत कॉंग्रेस नेते दत्ता कांबळे यांनी कौतुक केले. ते क्षीरसागर यांच्या सेवा निवृत्ती प्रीत्यर्थ आयोजित सन्मान सोहळ्यात बोलत होते. ई. एम. ई. या सैन्यदलात तेवीस वर्ष दीर्घ देशसेवा करत सुभेदार मेजर या ई. एम. ई या सैन्यदलातील सर्वोच्च हुद्द्यावर पोहचणारे सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर यांची ३१ डिसेम्बर २०२४ रोजी जम्मू आणि काश्मीर राज्यात नग्रोटा येथे कार्यरथ असताना सेवेतून निवृत्ती झाल्याने भारतीय कॉंग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा आंबेडकरी चाळवळीचे कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या वतीने पुष्पहार, मानाचा शेला, श्रीफळ व कंदी पेढा भरवत



सत्कार करण्यात आला.

ई. एम. ई. सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर हे शहरालगत असणाऱ्या पुनर्वसीत खानापूर या गावाचे रहिवाशी असून, २००२ साली सैन्यदलात भरती होऊन, ते तब्बल तेवीस वर्षांनी देशाची सन्मान जनक सेवा करत, सुभेदार मेजर मुरलीधर एकनाथ क्षीरसागर यांना अनेक पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे. घरची परिस्थिती अगदीच बेताचीच, त्याच्यावर मात करत त्यांनी देशाची सेवा हा एकमेव ध्यास उराशी बाळगून त्यांनी तब्बल तेवीस वर्ष देशाची सेवा करत यशस्वी सेवापुर्ती केली असल्यामुळे भारतीय कॉंग्रेसच्या वतीने त्यांच्या सेवापुर्ती निमित्त सत्कार करून भारतीय जवानाचा सन्मान केला. सुभेदार मेजर मुरलीधर क्षीरसागर यांचा आदर्श समाजातील युवकांनी घेऊन आपले जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन भारतीय कॉंग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी समाजातील युवकांना केले आहे. यावेळी सुभेदार मेजर मुरलीधर क्षीरसागर यांचे जेष्ठ बंधू छगन क्षीरसागर, वडील एकनाथ क्षीरसागर, आई सोजरबाई क्षीरसागर सह अप्पासाहेब भारस्कर, भारत जाधव, अशोक कांबळे, सहदेव चव्हाण, मुकुंद हिवाळे सह क्षीरसागर कुटुंबीय उपस्थित होते.



## जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज भक्त सेवा मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

**रक्तदान शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

पाटोदा । प्रतिनिधी

जगद्गुरु नरेंद्र महाराज माऊली

भक्त सेवा मंडळ बीड जिल्हा यांच्या वतीने आज.दि.७/१/२०२४ मंगळवार रोजी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात सकाळी आठ पासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होत. यामध्ये १५१ रक्तदात्यानी रक्तदान केले.यामध्ये रक्तदान शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.जगद्गुरु नरेंद्र महाराज सेवा मंडळ यांचा अविरत पणे वीस वर्षांपासून चाललेला हा उपक्रम चालु आहे.माऊलींचा संपूर्ण भारतभर व महाराष्ट्रात दोन हजार वीस पासून असले हे कप चालत आहे.मराठवाडा भक्तपिठ मधील जगद्गुरु नरेंद्र महाराज माऊली भक्त सेवा मंडळ बीड जिल्हा या जिल्ह्याच्या वतीने दोन हजार रक्त संकलन देण्याचा संकल्प यांचा आहे. जगद्गुरु नरेंद्राचार्य माऊली च्या उद्देशातून पन्नास हजार रक्त बाटल महाराष्ट्र सरकारला व पन्नास हजार बाटल भारतीय सैनिक दलांना देणार असल्याचे भक्तांनी सांगितले दैनिक बीड सिटीझन प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

# डागर बंधूंना पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार प्रदान

## अंबाजोगाईत संगीत सभेने रसिक मंत्रमुग्ध

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील पद्मश्री कै. शंकरबापू आपेगावकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा पद्मश्री शंकर बापूजी धृपद गौरव पुरस्कार शुक्रवारी (दि.३) जगप्रसिध्द धृपद गायक उस्ताद नफिसोद्दिन डागर व अनिसोद्दिन डागर या बंधूंना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त झालेल्या धृपद संगीत सभेत डागर बंधूंनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी संगीत व वारकरी संप्रदायातील मान्यवर व्यक्तींना पद्मश्री शंकरबापूंच्या स्मृती हा पुरस्कार दिला जातो. यंदाचा पुरस्कार सोहळा येथील इट अँड स्टे या हॉटेलच्या सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी नॅचरल शुगरचे प्रमुख बी.बी. ठोंबरे हे होते. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, उद्योजक लक्ष्मणराव मोरे, डॉ. नंदकिशोर सोमवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रख्यात पखावज वादक उध्दवबापू आपेगावकर व संध्याताई आपेगावकर यांची उपस्थिती होती.

बापूंनी समर्पणातून कला जोपासली

पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांनी आयुष्यभर पखावजाची संगीत



कला समर्पणातून जोपासली. संगीत पाषाणालाही पाझर फोडते, मन आणि बुध्दी तल्लीन होण्याची जादू संगीतामध्ये

आहे. असे सांगून डागर बंधूंचे धृपद गायन श्रवण करण्याची संधी मिळाल्याच्या भावना बी. बी. ठोंबरे यांनी व्यक्त केल्या.वडील उस्ताद सईदोद्दीन डागर यांच्यामुळे आम्ही धृपद संगीतात उभे राहिलो, त्यांची ही धृपद संगीताची पताका खांद्यावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहोत. बापूंच्या नावे मिळालेल्या पुरस्काराने आमची जबाबदारी आणखी वाढलेली आहे. त्याचा आदर करून शंकरबापूंच्या कलेला व त्यागाला उस्ताद डागर बंधूंनी नमन केले.

याप्रसंगी लक्ष्मणराव मोरे व डॉ. सुरेश खुरसाळे यांनीही शंकर बापूंच्या आठवणी सांगितल्या. उध्दवबापू आपेगावकर यांनी पुरस्काराची संकल्पना व भुमीका मांडली. या पुरस्काराचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करणार असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. सन्मानपत्राचे वाचन सीमा सोमवंशी यांनी केले. सूत्रसंचालन आसाराम जोशी यांनी केले. आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास माईर्स एमआयटी परिवारातील जेष्ठ तुळशीराम कराड यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी मधुवंती देव (पुणे), प्राचार्य बाबासाहेब ठोंबरे, संगीत क्षेत्रातील श्री. बार्शीकर, देविदास कुलकर्णी (कळंब), तुकाराम महाराज मुंडे, ज्येष्ठ समाजसेवक विठुसेठ आग्रोया यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

धृपद व पखावजाची जुगलबंदी

या पुरस्कार सोहळ्यापुर्वी डागर बंधूंचे धृपद गायन झाले. प्रारंभी त्यांनी राग आलाप व जोडझाला घेऊन कर्नाटकी थाटातील काम्बोजी हा राग सादर करून आपले वेगळेपण दाखवले. त्यांनी गायलेल्या शिव,शिव,शिव या आडाना रागाची लय बध्दता व आवाजातील आर्जवाने रसिक मंत्रमुग्ध झाले होते. सूलतालातील बंदिशीमध्ये धृपद व पखावजाची जुगलबंदी झाली. उध्दवबापू आपेगावकरांनी आपल्या पखावज वादनाने या संगीत सभेला झालर चढवली. सभागृहात उपस्थित रसिकांनी या जुगलबंदीला टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

cmyk




# एआ च्या माध्यमातून ऊस शेती, सत्या नाडेलांकडून एडीटीचं कौतुक; शरद पवारांचं खास ट्विट

पुणे/मुंबई : डिजिटल भारतात सध्या एआय म्हणजेच आर्टीफिशियल इन्टेलिजन्सची चलती असून एआ तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रत्येक क्षेत्रात गतीमानता आणण्यात येत आहे. विशेष म्हणजे शेतीसाठी देखील एआय तंत्रज्ञान क्रांतीकारी ठरत असल्याचे समोर आले आहे. बारामतीमध्ये एआयचा वापर करुन ऊसाच्या उत्पादन क्षमतेत वाढ झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, भारत दौऱ्यावर असलेल्या मायक्रोसॉप्ट कंपनीचे चेअरमन सत्या नंडेला यांनी बारामतीला भेट देऊन विशेष कौतुक केलंय.बारामतीमधील शेतकरी सुरेश जगताप यांनी अलीकडेच ऊस उत्पादनासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर केला. त्यासाठी, बारामती येथील ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट (एडीटी) चे वैज्ञानिक आणि मायक्रोसॉफ्ट एआय तंत्रज्ञानाची त्यांनी मदत घेतली. सत्या नाडेला यांनी या ऊस शेतीत केलेल्या प्रयोगाची दखल घेत बारामतीचं विशेष कौतुक केलं. त्यानंतर, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी ट्विट करुन सत्या नाडेला यांचे आभार मानले आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय तंत्रज्ञानावर) कृषी क्षेत्रात वापर करताना उसाची लागवड बारामतीतील कृषी विज्ञान केंद्रामध्ये या तंत्रज्ञानाद्वारे करण्यात आली आहे. या संशोधनाची दखल मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्य नडेला यांनी घेतली. हा यशस्वी प्रयोग एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे केवीकेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश नलवडे प्रगतशील शेतकरी सीमा चव्हाण त्यांनी दिल्ली येथे याचे सादरीकरण केले. संस्थेच्या कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल देखील मायक्रोसॉफ्टचे पार्टनरशिप असलेल्या संस्थेने घेत, चांगल्या पद्धतीने शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण याचा वापर करणार असल्याचे सांगितले. भविष्यातील शेती कशी असेल याला डोळ्यासमोर ठेवून आर्टिफिशिअल इंटेलिजन्स च्या माध्यमातून शेतीचा प्रयोग बारामतीमध्ये केला आहे. राज्यातील १००० शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्वावर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट ऊस या पिकासंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहे.

दरम्यान, १६ ते २० जानेवारी दरम्यान बारामतीतील अग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट येथे कृषी प्रदर्शन आयोजित आयोजित करण्यात आलं आहे. त्यामध्ये भविष्यातील शेती कशी असेल आर्टिफिशियल इंटेलिजन्स वरती केलेला ऊस आणि इतर पिके याची प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना बघायला मिळणार आहेत. परंतु त्याआधी अग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या टीमने सत्य नडेला यांना प्रेझेंटेशन दिलं. तसेच भविष्यातील शेती कशी असेल याचा प्रात्यक्षिक बारामतीतील कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांना या प्रदर्शनादरम्यान पाहायला मिळणार आहेत. सत्या नंडेला यांनी सोशल मीडियावरती पोस्ट केल्याने एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे सर्वत्र कौतुक होताना पाहायला मिळते. विशेष म्हणजे सत्या नंडेला यांनी ट्विट करुन याबाबत माहिती दिली होती. त्यावर, खासदार शरद पवार यांनीही रिप्लाय करत सत्या नंडेला यांचे आभार मानले आहेत.

सत्या नाडेलांचं ट्विट: बारामती येथील टीमला भेटून खूप आनंद झाला, जे आमच्या टूल्सचा वापर करून शेतकऱ्यांना सक्षम आणि शेतीमधील अधिक शाश्वत कापणीसाठी मदत करत आहेत, असे ट्विट सत्या नाडेला यांनी केलं होत. त्यावर, शरद पवारांनी धन्यवाद असा रिल्पाय दिला आहे. शेतीसाठी चे फायदे हायलाइट करण्यासाठी आपले आभार. बारामतीमधील शेतकऱ्यांना चा फायदा मिळवून देण्यासाठी, अत्याधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सह आम्ही वचनबद्ध आहोत. तसेच, शेती प्रयोगात तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम वापर केला जाईल याची खात्री देत सोबत काम करण्यास वचनबद्ध आहोत, असेही शरद पवारांनी म्हटले आहे.




## महत्वाच्या घटना

१७६० : बरारीघाट येथे अफगाण्यांनी मराठ्यांचा पराभव केला.
१७८८ : कनेक्टिकट हे अमेरिकेचे ५ वे राज्य बनले.
१७९० : ला बरारी घाटाच्या झालेल्या लढाई मध्ये अहमद शाह दुर्रानी ने मराठ्यांचा पराभव केला.
१८८० : क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना देशद्रोहाच्या आरोपावरुन जन्मठेपेची शिक्षा
१९१५ : महात्मा गांधींचे अफ्रिकेतुन भारतात आगमन
१९८२ : ला भारताचा पहिला शास्त्रज्ञ वर्ग अंटार्क्टिकाला पोहचला.
२००१ : नव्या सहस्त्रकातील पहिल्या महाकुंभमेळ्याला अलाहाबाद येथे प्रारंभ झाला.
२००१ : नव्या सहस्रकातील पहिले खग्रास चंद्रग्रहण दिसले.
२००२ : भारतीय महिला क्रिकेट संघाने इंग्लंड विरूद्ध एकदिवसीय मालिका जिंकली.
२००२ : महात्मा गांधी भारतात परतल्या बद्दल ९ जानेवारी हा भारतीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्याचे योजण्यात आले.
२००७ : स्टीव जॉब्स यांनी पहिला आयफोन प्रकाशित केला.
२०१२ : ला लिओनेल मेस्सी ने सतत दुसऱ्या वर्षी सुद्धा ''बैलोन डीओर'' नावाचा पुरस्कार जिंकला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३१ : फातिमा शेख : भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका
१९१३ : रिचर्ड निक्सन अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ एप्रिल १९९४)
१९१८ : मार्क्सवादी विचारवंत लेखक प्रभाकर उर्ध्वरेषे यांचा जन्म.
१९२२ : हर गोविंद खुराना जन्माने भारतीय असलेले अमेरिकन नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ९ नोव्हेंबर २०११)
१९२१ : बिहार चे माजी मुख्यमंत्री राम सुंदर दास यांचा जन्म.
१९२६ : कल्याण कुमार गांगुली तथा अनुप कुमार चित्रपट अभिनेते (मृत्यू: २० सप्टेंबर १९९७ मुंबई)
१९२७ : सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक आणि समीक्षक रा. भा. पाटणकर यांचा जन्म.
१९३४ : महेंद्र कपूर पार्श्वगायक (मृत्यू: २७ सप्टेंबर २००८ मुंबई)
१९३८ : चक्रवर्ती रामानुजम गणिती (मृत्यू: २७ आक्टोबर १९७४)
१९५१ : पं. सत्यशील देशपांडे ख्यालगायक व पं. कुमार गंधर्व यांचे पट्टशिष्य
१९६५ : फराह खान नृत्यदिग्दर्शक
१९७४ : बॉलीवूड अभिनेता फरहान अख्तर यांचा जन्म.
१९८३ : भारतीय अभिनेता शरद मल्होत्रा यांचा जन्म.
२००० : भारताची प्रसिद्ध धावपटू हिमा दास यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : कॅरोलिन हर्षेल जर्मन-ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ, ही प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ विल्यम हर्षेलची बहिण असून तिनेही ८ धुमकेतू व ३ तारकासमुह शोधले आहेत. (जन्म: १६ मार्च १७५०)
१८७३ : तिसरा नेपोलियन बोनापार्ट यांचे निधन.
१९२३ : सत्येंद्रनाथ टागोर पहिले भारतीय सनदी अधिकारी (जन्म: १ जून १८४२)
१९४५ : प्रसिद्ध राजनीती तज्ञ छोटू राम यांचे निधन.
१९७३ : फ्रांसचे पहिले अध्यक्ष लुई-नेपोलियन बोनापार्ट उर्फ नेपोलियन ३रा यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८०८)
२००३ : कमर जलालाबादी गीतकार व कवी (जन्म: १९१९)
२००४ : शंकरबापू आपेगावकर पखवाजवादक (जन्म: १९११)
२०१३ : जेम्स बुकॅनन नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थतज्ञ (जन्म: ३ आक्टोबर १९१९)

# कडुनिंबावर पडणारा घातक 'डायबॅक' रोग



तेलंगणा आणि दक्षिणेकडील इतर राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून कडुनिंबाच्या डहाळ्या, पाने सुकणे, आणि झाड वाळणे असे दृश्य दिसत आहे. १९९० च्या दशकात उत्तराखंडमधील डेहराडून जवळील प्रदेशात या रोगाची नोंद झाली होती. त्यानंतर २०१९ मध्ये तेलंगणामध्ये 'डायबॅक' रोगाची प्रथम ओळख झाली. २०२१ साली तेलंगाना सोबतच कर्नाटक, आंध्रप्रदेश, या राज्यात या रोगाचा प्रसार वाढल्याचे निदर्शनास आले आहे.

'डायबॅक' रोगाची कारणे

कडुनिंबाच्या झाडावर येणाऱ्या या रोगाला शास्त्रीय भाषेत 'डायबॅक' असे म्हणतात. 'ट्वीग ब्लाईट' नावाने सुद्धा या रोगाला ओळखतात. फोमोप्सिस ॲझाडिराक्टे' बुरशीमुळे डायबॅक रोगाचा संसर्ग होतो. या बुरशीचा संसर्ग सर्व वयाच्या आणि आकाराच्या कडुनिंबाच्या झाडांना होतो. तज्ज्ञांच्या मते, खोडकिडीद्वारे कडुनिंबाच्या फांद्यांना छिद्रे पाडल्यानंतर या बुरशीजन्य रोगाचा प्रसार वाढतो. उच्च आर्द्रता आणि हवामानातील बदल हे देखील डायबॅक रोगाच्या बुरशीच्या प्रसारास जबाबदार आहे.

'डायबॅक' रोगाची लक्षणे

पावसाळ्याच्या सुरुवातीला या रोगाची लक्षणे दिसायला सुरुवात होते, आणि हिवाळ्याच्या सुरुवातीस रोगाची तीव्रता वाढत जाते. मर रोगामुळे कडुनिंबाच्या झाडांची पाने, डहाळे आणि फुलोरा प्रभावित होतात. पाने कोमेजतात, पिवळी आणि नंतर तपकिरी होतात, पानगळ होते, खोड आणि फांद्या गडद आणि पोकळ होतात, शेवटी संपूर्ण झाड वाळते/ मरते. उत्पादनावर दुष्परिणाम होतो. विशेषतः जुनी झाडे लवकर प्रभावित होतात व वाळतात. नवीन किंवा जास्त जुनी नसलेल्या कडुलिंबाच्या झाडांवर या रोगाचा संसर्ग कमी प्रमाणात होतो, किंवा रोगाची लागण झाली तरी अशी झाडे टिकतात.

'डायबॅक' रोगासाठी एकात्मिक नियंत्रण उपाय

या रोगावरील नियंत्रण पद्धती सोपी वाटत असली तरी आव्हानात्मक आहे. रोगास कारणीभूत असणाऱ्या बुरशीचे संक्रमण हवेतून होत असल्याने एका झाडावर नियंत्रण उपाय केल्यानंतरही शेजारच्या झाडाच्या बुरशीचे बीजाणू उपचार केलेल्या रोपाला/ झाडाला हानी पोहचवू शकतात. बरेचदा मोठ्या झाडांवर बुरशीनाशक/ कीटकनाशकाची फवारणी करणे धोकादायक ठरू शकते, कारण प्रादुर्भावीत झाडाजवळ असणारी फुलपाखरे, मित्रकिडी यासाठी ही फवारणी हानिकारक ठरते. तसेच या फवारणीमुळे पाण्याचे स्त्रोत सुद्धा दूषित होऊ शकतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक आणि नियंत्रण उपायांचा योग्य प्रकारे आणि सावधगिरीने अवलंब करणे गरजेचे आहे. हा बीजजन्य आणि बीज प्रसारित रोग असल्यामुळे कडुनिंबाच्या बियांवर लागवडीपूर्वी बाविस्टीनची किंवा कार्बेन्डाझिमची बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्माचा वापर रोपांचे आरोग्य सुधारून त्यांची रोगप्रतिकारक क्षमता वाढविते. नियमित लक्ष ठेवता येईल अशा ठिकाणी कडुनिंबाची रोपे लावावीत, झाडांची आणि रोपांची नियमित पाहणी करावी. रोगग्रस्त झाडांच्या आणि रोपांच्या फांद्या छाटून नष्ट करावे आणि झाडाला/ रोपाला बुरशीनाशक आणि कीटकनाशकांचे मिश्रण लावावे. रोगग्रस्त झाडाभोवती खड्डा खणून त्यात कीटकनाशक + बुरशीनाशक + पाण्याचे मिश्रण तयार करून ओतावे.

रासायनिक नियंत्रण उपाय : प्रोफेनोफॉस २ मिली प्रति लिटर या प्रमाणात संपूर्ण झाडावर, पानांवर फवारणी करावी. यानंतर मॅन्कोझेब ६३% + कार्बेन्डाझिम १२५ डब्ल्यूपीचे मिश्रण दुसऱ्या दिवशी फवारावे. काही संशोधनानुसार, सिस्टेनिक बुरशीनाशक कार्बेन्डाझिम ५०% हे हानिकारक रोग जनकांच्या विरूद्ध अत्यंत प्रभावी सिद्ध झाले आहे. कार्बेन्डाझिम ५०% ची पानांवर फवारणी करावी. प्रादुर्भाव झालेल्या झाडांवर १ ग्रॅम बाविस्टिन/लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

# शेतकऱ्यांनो, खोट्या संदेशांपासून सावधान

लातूर : केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयामार्फत 'पीएम कुसुम योजना' राबविली जात आहे. त्याद्वारे शेतकऱ्यांना सौर कृषी पंप अनुदान तत्त्वावर देण्यात येत आहेत.

त्यासाठी शेतकऱ्यांना पाच ते दहा टक्के लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरावा लागतो. पण याचे खोटे संदेश पाठवून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे प्रकार राज्यात घडत आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी अशा खोट्या संदेशांपासून सावध राहावे. असा संदेश आला तर 'महाऊर्जा'कडे याची खात्री करूनच ऑनलाइन पैसे भरावेत, असे आवाहन 'महाऊर्जा'चे लातूरचे विभागीय महाव्यवस्थापक समीर घोडके यांनी केले आहे.'पीएम कुसुम योजनेद्वारे तीन, पाच व साडेसात एचपी क्षमतेचे सौर कृषी पंप ९० ते ९५ टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना दिले जात आहेत. राज्य शासनाने या योजनेसाठी एक लाख चार हजार ८२३ सौर कृषी पंपांसाठी मान्यता दिली आहे.

त्यानुसार महाऊर्जामार्फत लोकसंख्येनुसार जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. महाऊर्जामार्फत सद्यःस्थितीत सुमारे ७५ हजार ७७८ सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले आहेत.

पीएम कुसुम योजनेत महाराष्ट्र देशात



अव्वल : खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यास दहा टक्के व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यास पाच टक्के लाभार्थी हिस्सा भरण्यासाठीचा एसएमएस पाठविला जातो. ही योजना राबविण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल विकसित केले आहे.

त्याद्वारे अर्जापासून ते कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची छाननी करणे, शेतकऱ्याना लाभार्थी हिस्सा भरण्यासाठी एसएमएस पाठवणे, लाभार्थी हिस्सा ऑनलाइन भरण्याची शेतकऱ्याना मुभा देण्यात आली आहे. पण राज्यात काही ठिकाणी शेतकऱ्यांना खोटे संदेश पाठवून लाभार्थी हिस्सा भरून घेऊन फसवणूक केल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

# तुती रेशीम शेती, नफ्याची शेती

हवामान:

महाराष्ट्र राज्याची कृषि विषयक हवामानाची परिस्थिती बघता तुती पाल्याचे बारमाही उत्पादन घेता येऊ शकते तुती लागवडीसाठी ७५० मिलि. मी. ते १००० मिलि.मी. पाऊस वर्षभर समप्रमाणात पडत असलेल्या भागात लागवड केल्यास तुतीला पोषक वातावरण मिळून पाल्याचे उत्पादन वाढते. तुती लागवडीस थंड व उष्ण दोन्हीही प्रकारचे हवामान मानवते.

जमीन: मध्यम, भारी, हलकी प्रकारची जमीन असली तरी तुतीची लागवड करण्यास योग्य असते. मात्र डोंगर उताराची व खारट जमीन म्हणजेच ज्या जमीनीत पानी साचून राहते किंवा पाण्याच निचरा होत नाही अशी जमीन तुती लागवडीसाठी अयोग्य असते. जमिनीचा थर किमान २ फुट खोल असावा. जमीनीतील सामु (पी.एच.) हा ६.५ ते ७ पर्यंत असणे योग्य असतो.

जमीन तयार करणे व शेणखताचा वापर: लोखंडी नांगराने १२ ते १५ इंच (३० ते ४५ सेमी.) खेल नांगरट करावी. जमीनीची नांगरट करतांना उभी व आडवी दोन्ही बाजुनी नांगरटी करावी. पुन्हा १५ ते २० दिवसानंतर लाकडी नांगराने एकदा उभी व आडवी नांगरनी करुन घ्यावी, नांगरनी झाल्यानंतर एकरी ८-१० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत सर्व जमिनीत सारया प्रमाणात पसरवावे नंतर वखरणी करुन जीमन सारखी करुन घ्यावी.

तुतीच्या प्रचलीत व सुधारीत जाती: तुतीची प्रचलीत जात कनव्हा-२ अथवा एम-५ ही जात निवड पध्दतीने शिफारस केली आहे. या जातीच्या पाल्याचे उत्पादन बागायती क्षेत्रावर ३५,००० कि. ग्रॅम प्रति हेक्टर प्रति वर्ष येत असून या झाडाना ३०० कि.ग्रॅम १२० कि.ग्रॅम १२० कि. ग्रॅम नत्र,



स्फुरद, पालांश खताचा मात्रा वेगवेगळया ५ हप्त्यात द्यावा लागतो. तसेच २० टन शेणखत प्रति हेक्टर द्यावे. या जातीला १.५ एकर इंच सिंचनासाठी पानी आवश्यक आहे.

याशिवाय एस-३०, एस-३६, एस-५४, एस-१३५, डी. डी. आणि एम.आर-२, या जाती सी एस.आर. ॲण्ड टि. आय. म्हैसूर या संस्थेने बागायती क्षेत्रासाठी विकसित केलेल्या असून त्या लागवडीखाली तसेच क्षेत्र गुणवी कार्यकम खाली चाचण्या चालू आहेत.

तुतीची लागवड व देखभाल: तुती लागवड तुतीबेण्या पासून करायची असते. त्यासाठी एम-५, एस-५४, एस-३६, व्ही -१ अशा सुधारीत जातीची बेणे वापरावीत. बेणे तयार करतांना ६ ते ८ महिने वयाच्या तुती झाडांची १० ते १२ मि.मि. जाडीच्या फांद्या निवडण्यात याव्यात व बेण्याची लांबी ६ ते ८ इंच असावी. त्यावर किमान ३ ते ४ डोळे असावेत व तुकडे करातांना धारदार कोयत्याने तुकडे करावेत कोवळया फांद्या बेणे तयार करण्यासाठी वापरु नयेत.

तुतीचे लागवड अंतर: तुती लागवड करतांना घ्यावयाची काळजी:

लागवडीकरिता किमान सहा महिने जूने व बागेस पाणी दिलेले तुती बेणे वापरावे. त्यानंतर तुती बेणे छाटणी केल्यापासून २४ तासांच्या आत लागवड केल्यास त्याचा फुटवा चांगला होतो व बागेत तुट अळी पडत नाही. तुती बेणे छाटणी धारदार हत्याराने किंवा सिकॅटरने ३ ते ४ डोक्यावरच करावी. जास्त लांब काडी तोडू नये. तुतीची लागवड ५ द ३ द२ किंवा ६ द २ द १ अथवा इतर अंतरावर जोड ओळ पध्दतीनेच करावी. तुतीची काडी लावताना ३ डोळे जमिनीत व एकच उभा डोळा जमीनीवर ठेवावा. उलटी काडी लावू नये.

तुती बागेची आंतर मशागत:तुती कलमांची लागवड केल्यानंतर १ महिन्याने खुरपणी /निंदणी करुन गवत/तन काढावे बागेतील गवतामुळे सूर्यप्रकाश मिळत नाही व उष्णता निर्माण होवून तुती कलमाची पाने पिवळी पडतात तसेच तुती कलमांना गवतामुळे अन्नद्रव्ये कमी पडून पाने गळून पडतात.त्यामुळे तण काढणे अतिशय आवश्यक बाब आहे. तदनंतर प्रत्येक पीकानंतर उपलब्ध साधन व अंतरानुसार बैलजोडी अथवा टॅक्टरने अंतर मशागत करावी.

तुती झाडांची छाटणी: तुती झाडांच्या छाटणी करीता सिकॅटरचा वापर केला पाहिजे. १ वर्ष प्रत्येक पीकानंतर झाडावर सरळ वाढणाऱ्या ७ ते ८ फांद्याची दोन डोळयावर छाटणी करुन उर्वरीत फांद्या काढून टाकाव्यात. दिड ते दोन वर्षानंतर तुती झाडाची जमिनीलगत छोटया करवतीच्या सहाय्याने कापणी करावी. अशा प्रकारे छाटणी केल्यानंतर तुती झाडापासुन सकस व भरपुर पाला मिळतो.

तुतीबागेस सिंचन:

तुती कलमांची लागवड केल्यानंतर पाऊस कमी पडल्यास किंवा १० ते १२ दिवसाचा खंड पडल्यास विहिरीचे पाणी देवून कलमे जगतील याची काळजी घ्यावी. लागवड केल्यानंतर सात ते आठ दिवसाच्या अंतराने कलमें जगेपर्यंत पाणी द्यावे नंतर डिसेंबर ते मे महिन्यापर्यंत जमिनीची प्रत पाहुन साधारणत: १० ते १२ दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात एक वेळातुती लागवडीला १ ते १.५ एकर इंच पाण्याची आवश्यकता असते.

# हैद्राबाद मुक्ती लढ्याच्या समग्र पैलूंचा अभ्यास होणे आवश्यक-प्रा.महेश जोशी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हैद्राबाद मुक्ती लढ्याच्या समग्र पैलूंचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या मुक्ती लढ्याला अनेक कंगोरे आहेत. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील शिक्षण शास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. महेश जोशी यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र संशोधन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बीजभाषणात डॉ. महेश जोशी यांनी हैद्राबाद मुक्ती लढ्याच्या संदर्भात महत्त्वाच्या घटनांचा ऊहापोह केला. हैद्राबाद मुक्ती लढ्याला हिंसाचाराचा संदर्भ जोडला गेला आहे पण रक्तपाताशिवाय क्रांती शक्य नाही, जुलमी, अत्याचारी राजवट उलथवून टाकण्यासाठी सशस्त्र संघर्ष करणे अपरिहार्य होते असे मत डॉ. महेश जोशी यांनी व्यक्त केले .हा लढा यशस्वी झाल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होणार नव्हते. यामुळे स्वामी रामानंद तीर्थ व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा संघर्ष तीव्र केला होता. निजाम आपल्या स्वायत्तेसाठी, हैद्राबाद येथे स्वतंत्र इस्लामी राज्याच्या निर्मितीसाठी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय




पातळीवर नेण्याचा प्रयत्न करीत होता. एका अर्थाने स्वामी रामानंद तीर्थ व त्यांच्या सहकाऱ्यांचा लढा ऑटोमन साम्राज्याच्या विरुद्धही होता असे मत डॉ. महेश जोशी यांनी व्यक्त केले.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उ.महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील इतिहासतज्ज्ञ डॉ. प्रशांत देशमुख यांच्या हस्ते झाले. या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ. सुरेश खुरसाळे यांनी हा लढा सामान्य माणसांचा लढा होता. केवळ अभिजन वर्गापर्यंत हा सिमित नव्हता असे मत व्यक्त केले. हैद्राबाद स्टेट काँग्रेस, स्वामीजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या लढ्याला लोक लढ्याचे स्वरूप दिले, एक वेळ ब्रिटिशांविरुद्ध लढणे सोपे होते कारण ब्रिटिश लोकशाही स्वातंत्र्य या संकल्पना मानणारे होते पण निजाम सरंजामी, धर्मांध अत्याचारी शासक होता. त्यामुळे हा लढा कठीण होता असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या संबोधनाने झाला हैद्राबाद मुक्ती लढा वैशिष्ट्यपूर्ण लढा होता , सर्वसामान्यांचा, स्त्रीयांचा सहभाग यात होता अत्याचारी निजामी राजवट उलथवून टाकण्यासाठी संस्थांनी प्रजेने हा संघर्ष तीव्र केला होता असे मत त्यांनी व्यक्त केले. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.आर.थारकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या राष्ट्रीय परिषदेच्या संयोजिका, राज्यशास्त्र संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ.शैलजा बरुरे यांनी प्रास्ताविक केले. हैद्राबाद मुक्ती लढ्याचा इतिहास का समजून घेतला पाहिजे या बद्दलची भूमिका विषद केली. या कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी यांनी केले तर राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.रमेश सोनवळकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर,सहसचिव प्रा. भिमाशंकर शेटे,प्रा. माणिकराव लोमटे, प्रा. गोळेगावकर, जेष्ठ पत्रकार प्रा.नानासाहेब गाठाळ, डॉ. साहेबराव गाठाळ, मा. प्राचार्य कमलाकर कांबळे, संतराम कराड, विविध महाविद्यालयातून आलेले संशोधक प्राध्यापक, विद्यार्थी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शनी जन्मोत्सव उत्साहात

### विविध राज्यातूनही भाविकांची अलोट गर्दी



बीड। प्रतिनिधी

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या बीड शहरातील शनीच्या साडेतीन पिठांपैकी अर्धपीठ असणाऱ्या शनी देवस्थान येथे शनी जन्मोत्सव सोहळा हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला. या जन्मोत्सव सोहळ्यासाठी राज्यासह देशातील विविध भागातून शनी भक्त मोठ्या उपस्थित होते. यावर्षीचा शनी जन्मोत्सव सोहळा दि. ०७ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त देवस्थान ट्रस्ट बीडच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. सकाळी काकडा आरती, गाथा भजन, त्यानंतर भागवत कथा, दिंडी नगर प्रदिक्षणा, दुपारी दोन ते सहा या वेळेत महारुद्राभिषेक इ. कार्यक्रम संपन्न झाले. सायं.सहा वाजता शनी जन्म सोहळा मोठ्या उत्साही वातावरणामध्ये संपन्न झाला. शनी जन्म सोहळ्यासाठी देशाच्या विविध भागातून हजारोंच्या संख्येने शनिभक्त उपस्थित होते. जन्मोत्सवाचे नियोजन व उत्कृष्ट आयोजन संस्थानचे अध्यक्ष रामनाथ खोड व सर्व विश्वस्थ केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आदित्य पायगुडे, श्रीकृष्ण महाराज उबाळे, संतोष महाराज डोंगरे, तेजस मते, वैभव काकडे यांच्यासह सर्व शनी भक्तांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात



### सिद्धेश्वर महाविद्यालयात'वाचन-संकल्प महाराष्ट्राचा 'उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भा.शि. प्र.संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांच्या समूह वाचनाचा उपक्रम घेण्यात आला.यामध्ये साठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या ग्रंथप्रदर्शनाचे उदघाटन प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य प्रा. अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, ग्रंथपाल प्रा.सुरेश बनसोडे,प्रा. प्रेमदास राठोड,प्रा. जिजाराम बागल, प्रा.डॉ.ज्ञानेश्वर गवते,प्रा.गंगाधर उषमवार,ग्रंथालय कर्मचारी आतिश गुगळे,सुरेश निवडुंगे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### दोन मंडळात अनुदान मंजूर

पाटोदा । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे पीक बाधित शेतकऱ्यांना अनुदान देण्याची प्रक्रिया सुरू आहे पहिल्या टप्प्यात काही शेतकऱ्यांच्या अनुदान



बँक खात्यावर जमा झाले आहे पाठवता तालुक्यातील दासखेड आणि पाटोदा अशा केवळ दोन मंडळात अनुदान मंजूर झाले कुसुम थेरला अमळनेर मंडळात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्याचे मोठी मुस्कान झाले मात्र परत जन्यमापकातील सदोष मोजणी मुळे या मंडळातील शेतकरी अनुदानापासून वंचित आहेत उपविभागीय अधिकारी व सीमा शेख यांच्या ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी यासाठी तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी बैठक घेऊन मार्ग काढण्याची ग्वाही शेख यांनी च पावसाळ्यात तालुक्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली यामध्ये काही शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले शेतकऱ्यांचा मशागत खर्चही निघाला नाही शासनाने शेतकऱ्यांना मदत जाहीर केली मदत निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावरून वितरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे थेरला आणि अमळनेर मंडळातील शेतकरी मात्र मदतीपासून वंचित आहेत या मंडळाच्या मुख्यालय असलेल्या पर्जन्यमापक यंत्रावरून पूर्ण परिसराची आकडेवारीशी असणारा पाठवली

### सप्तसुत्री कार्यक्रम राबविण्याचे आवाहन

बीड : प्रशासनाच्या सेवांच्या गुणवतेमध्ये वाढ, लोकाभिमुखता, निर्णयशिलता आण्याण्यासाठी सर्वांच्या सहकार्यातुन उत्तम प्रशासन कार्यान्वित कार्यालयीन गतिमानता अभियान १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत बीड जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अंगीकृत उपक्रम सप्तसुत्री कार्यक्रम कार्यालयात राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे. सप्तसुत्री कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.वेबसाईट सुगमीकरण, कार्यालयीन स्वच्छता, पिण्याचे पाणी उपलब्धता, स्वच्छतागृहाची स्वच्छता, नागरिकांना सेवा सुलभ मिळण्याच्या दृष्अीने शासनाच्या २ महत्वकांक्षी योजनांची अमंलबजावणी, अर्धनयायिक प्रकरणे चौकशी प्रकरणे, दंडाधिकारीय प्रकरणे विविध पोर्टलवरील प्राप्त तक्रारी निर्गत करणे, अभ्यांगताना भेटीसाठी वेळ सुनिश्चित करुन देणे, लोकशाही दिनाची अंमलबजावणी, गुंतवणुकीला प्रोतसाहन देणे. कार्यालयाची आवश्यक डागडुजी व निगा राखणे, क्षेत्रीय भेटीचे पूर्व नियोजन करुन त्यानुसार क्षेत्र भेटी करणे. प्रत्येकी विभागाने कार्यालयीने आपल्या विभाग कार्यालयां अंतर्गत अधिकारी कर्मचारी, कर्मचारी यांच्या संवाद कार्यक्रमाचे करावे त्यात कर्मचारी यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविणे विषयक सकरात्मक प्रयत्न विभाग, कार्यालय प्रमुखाने यांनी आयोजन करावे.शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजंनाची परिणमकारक अमंलबजावणी करुन नागरिकांना शासकीय कामात गुणात्मक बदल दृश्य स्वरुपात दिसावा यासाठी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत असेही आवाहन करण्यात आले आहे.

## ॲड.गोरक्ष लोखंडे यांच्याशी आदिवासी बांधवांच्या विविध समस्यांवर चर्चा-ॲड.पवार

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती-जमाती आयोगाचे सचिव ॲड.गोरक्ष लोखंडे हे बीड येथे शासकीय तथा निमशासकीय कामासाठी आले असता त्यांची एकलव्य भिल्ल समाज संघटना महाराष्ट्र कार्याध्यक्ष ॲड. सुर्यकांत पवार यांनी सदिच्छा भेट घेवून सत्कार केला व राज्यातील आदिवासी बांधवांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली.



ॲड.गोरक्ष लोखंडे हे शासनाचे राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा) असून त्यांच्याकडून नुकतेच काही दिवसांपुर्वी आदिवासी समाजातील १२०० तरुणांना शासकीय नोकरीमध्ये स्थगिती असतांना ती स्थगितीवर योग्य तो मार्ग काढून तरुणांना नोकरीत सामावून घेण्यात आले तसेच आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या नोकर भरतीमध्ये होणारी बोगस घुसखोरी रोखण्यासाठी उपाय केले जातात तसेच जात प्रमाणपत्राच्या आधारे होणारी नोकरीमध्ये बोगस भरतीवर प्रतिबंध घालण्यासाठी प्रयत्न केले जातात तसेच यावेळी चर्चा करतांना ॲड.सुर्यकांत पवार यांनी राज्यात शासकीय अधिकारी तसेच पोलीस प्रशासन यांच्याकडून मिळणारी अविश्वासाची आरोपींसारखी वागणूक हा प्रश्न शासन दरबारी मांडण्याची विनंती केली तसेच यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप गोरे आणि सावता परिषद संस्थापक कल्याण आखाडे यांनी जिल्हाभरातील आदिवासी बांधवांसाठी शबरी माता घरकुल योजना, ठक्कर बप्पा योजनांचा लाभ मिळावा यासाठी आपण शासन दरबारी हा प्रश्न मांडावा अशी विनंती करुन ॲड.गोरक्ष लोखंडे यांच्यासोबत विविध प्रश्नांवर चर्चा केली.

## चांगल्या आरोग्यासाठी चारित्र्यसंपन्न जीवन जगले पाहिजे -डॉ इम्रान शेख

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात शासकीय ग्रामीण रुग्णालय पाटोदा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला तक्रार निवारण कक्षाच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ विश्वास कदम तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ इमरान शेख वैद्यकीय अधिकारी डॉ पूनम तागड मॅडम सिस्टर काळे मॅडम श्री दिशांत भारती सर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा ज्योती रकटे उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरां चा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला.




या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिबिराचे संयोजक श्रीमती रकटे मॅडम यांनी केले चांगले आरोग्यासाठी शासनाच्या वतीने अशा शिबिराचे आयोजन करण्यात येते शिबिरात मुलींचे वैद्यकीय तपासणी व मानसिक आरोग्य या विषयावर डॉक्टर इमरान शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी आपल्या मनोगत युवकांनी १८ ते ३० वयोगटात वेगवेगळ्या चांगल्या सवयी लावून आपले मानसिक आरोग्य सुधारावे वाईट सवयी दूर कराव्यात इंटरनेटचा वापर कमी करावा मोबाईलचा वापर कमी करावा वाचन खेळ वेगवेगळ्या स्पर्धेत सहभाग घ्यावा आणि मानसिक तणावापासून दूर राहण्याचे आव्हान डॉक्टर शेख यांनी केले तर डॉक्टर पुनम मॅडम यांनी महिलांच्या वेगवेगळ्या आरोग्य विषयी तक्रारी या विषयावर मनोगत व्यक्त केले या समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी वैद्यकीय तपासण्या करून घ्याव्यात व आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केलेऔ प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी आपले जीवन जगत असताना वाईट व्यसनाच्या आहारी जाऊ नये असे आव्हान केले या कार्यक्रमाचे आभार डॉक्टर गोविंद बामणे यांनी मांडले तर सूत्रसंचालन डॉक्टर लोखंडे बीबी यांनी केले या कार्यक्रमासाठी प्राध्यापक आनंद भगत डॉक्टर गोविंद बांदडे डॉक्टर शिवाजी काकडे प्राध्यापक जोशी प्राध्यापक डोंगरे सर प्राध्यापक बजरंग दिसले प्राध्यापक शिवाजीराव भोरे यांनी परिसरात घेतले या शिबिरासाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी ने मोठ्या संख्येने सहभागी होती उपस्थित होते नाईक नवरे मावशी कुणाल काळे दत्ताची चादर यांनी सहकार्य केले.

## बागेश्वरी दुर्घटनेतील पीडितांना बागेश्वरीकडून प्रत्येकी दहा लाखाची मदत

जालना । प्रतिनिधी

एनर्जी अँड इन्फ्राप्र- ोजेक्ट च्या परतुर तालुक्यातील बागेश्वरी साखर कारखान्यातील गंधक च्या टाकीचा स्फोट होऊन यामध्ये दोन कामगारांचा मृत्यू झाला होता. या कामगारांना मदत मिळावी म्हणून राहुल लोणीकर यांनी पुढाकार घेत मयत कुटुंबांना घटना घडल्यानंतर सांत्वन भेटीच्या वेळी कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांना बोलून प्रत्येकी दहा लाख रुपये आर्थिक मदत म्हणून द्यावी अशी मागणी स्वतः राहुल लोणीकर यांनी केली होती.



यावेळी कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी राहुल लोणीकर यांचा शब्द पाळून मयताच्या नातेवाईकांना मदत जाहीर केली घटनेच्या काही दिवसानंतरच राहुल लोणीकर यांच्या हस्ते आबासाहेब शंकरराव पारखे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता पीडित कुटुंबांना मदतीचा धनादेश वितरित करण्यात आला यावेळी शत्रुघ्न कणसे, रवी सोळंके, नरेश कांबळे, कारखान्याचे जनरल मॅनेजर ऊस पुरवठा अधिकारी तसेच शिरसगाव चे उपसरपंच प्रभाकर जाधव ,पांडुरंग खरात, इंद्रराव जाधव ,तुकाराम माटे ,सुनील खरात ,सखाराम कंकाळ स्वप्नील रोडगे, संतोषशेजुळ ,यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. यावेळी राहुल लोणीकर यांनी बोलताना सांगितले की घडलेली घटना ही दुर्दैवी आहे ही कोणत्याच मदतीने पूर्ण होणारी नाही परंतु करता माणूस घरातून गेल्यास राहिलेल्या कुटुंबांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असतो यामुळे मदत करणे म्हणून सदरील मदत कारखान्याच्या माध्यमातून देण्यात येत आहे पुढे बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की मतदारसंघ म्हणजे माझा कुटुंब आहे या कुटुंबा वर येणारे संकट म्हणजे लोणीकर परिवारावर येणारे संकट आहे त्यामुळे लोणीकर परिवार हा मतदारसंघातील कोणत्याही गोरगरीब वरील येणार संकटसाठी मदत करण्यासाठी प्रयत्न करण्याचा काम आमचा आहे असे राहुल लोणीकर म्हणाले.

## एसकेएस क्लासची शैक्षणिक सहल



बीड । प्रतिनिधी

शहरातील नामांकित असलेले व ज्या क्लास च्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपले नाव केले असे एसकेएस क्लासेस संस्कार कॉलनी, गयानगर बीडच्या विद्यार्थ्यांची चौथी शैक्षणिक सहल हैदराबाद या ठिकाणी दिनांक १९ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२४ या कालावधी मध्ये संपन्न झाली. यावेळी सहीमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून ऐतिहासिक स्थळांची पहाणी करून आनंद साजरा केला.

गोळकोंडा फ़ोर्ट, रामोजी फ़िल्म सिटी, बिर्ला मंदिर, बिर्ला म्युझियम, सालार जंग म्युझियम, नेहरू पार्क, टायगर सफ़ारी अश्या विविध ठिकाणी विद्यार्थीनी सहलीचा शैक्षणिक बाबतीत माहिति घेतली. सहलीत फोटो सेशन असेल, गोळकोंडा किल्ला चा पायी चालून घेतलेली एतेहासिक तथ्य असो, रामोजी फ़िल्म सिटी मध्ये विद्यार्थ्यांनी फ़िल्म सेट असो जसे की बाहूबली चा नयन रम्य सेट, विविध फ़िल्म जिथे चित्रित झाल्या ते फ़िल्म चे लोकेशन्स असतील, बिर्ला मंदिर हे तर व्हाइट मार्बल मधे तयार झालेले डोळ्याचे पारणे फेडणारे मंदिर होय. तसेच विद्यार्थी बिर्ला म्युझियम मध्ये विविध वैज्ञानिक प्रयोग पाहिले, टायगर सफ़ारीत प्रत्यक्ष वाघ असो वा सिंह पाहणे वेगळे अनुभव देऊन गेले. एकुण प्रवास असो तसेच राहणे सोय व जेवण उत्तम असा विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. यावेळी एसकेएसच्या सर्व टिमने मोठे परिश्रम घेतले. एसकेएसने आयोजित केलेल्या सहीने विद्यार्थ्यांमध्ये नवचेतना निर्माण झाली असून विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या तयारीला आनंदाने लागल्याचे दिसून आले.

## बालकल्याण समितीकडे असलेल्या बालकांची ओळख पटवून ३० जानेवारीपर्यंत घेऊन जाण्याचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

चि.माणिक उत्तरेश्वर यादव जन्म दिनांक १४/०६/२०१४ वय १० वर्ष ०६ महिने रा. सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. बालकाचा रंग काळा सावळा असून डाव्या गालावर तीळ आहे. हे बालक मा. बालकल्याण समिती बीड यांच्या आदेशाने दिनांक २८/११/२०२२ रोजी या बालगृहात दाखल झाला आहे. सदर बालकास दाखल झाल्यापासून कोणीही आई वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही.चि.गणेश रेश्मा पवार जन्म दिनांक ०४/०९/२०१२ वय १२ वर्ष ०३ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड सध्याचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. बालक हा रंगाने काळा सावळा असून उजव्या डोळ्यावर तीळ आहे.हे बालक मा. बाल कल्याण समिती बीड यांच्या आदेशाने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी या बालगृहात दाखल झाला आहे.

चि..सूर्या रेश्मा पवार दिनांक २२/०४/२०१५ वय ०९ वर्ष ०८ महिने, सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. बालकाचा रंग गोरा असून उजव्या बाजूला मानेवर तीळ आहे. हे बालक मा. बाल कल्याण समिती,जळगाव यांच्या बदली आदेशाने व मा. बाल कल्याण समिती बीड यांच्या आदेशाने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी या बालगृहात दाखल झाला आहे. चि.राज रेश्मा पवार वय ०६ वर्ष (अंदाजे) सध्याचा पत्ता सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड व कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव.बालकाचा रंग गोरा असून चेहरा गोलाकार आहे.छातीवर तीळ आहे. बाल कल्याण समिती,जळगाव यांच्या बदली आदेशाने व मा. बाल कल्याण समिती बीड यांच्या आदेशाने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी या बालगृहात दाखल झाला आहे आहे. कु. गंगा रेश्मा पवार जन्म दिनांक २१/०७/२०१३ वय ११ वर्ष ०५ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. कायमचा पत्ता रा.पहूर पेठ ता. जामनेर जि. जळगाव. बालिकेचा रंग गोरा असून दोन्ही भुवयामध्ये तीळ आहे. मा.कल्याण समिती,जळगाव यांच्या बदली आदेशाने व मा. बाल कल्याण समिती बीड यांच्या आदेशाने दिनांक ०५/१०/२०२३ रोजी या बालगृहात दाखल झाला आहे. कु.जया विदेश उपाध्याय जन्म दिनांक ०१/०२/२०१९ वय ०५ वर्ष ११ महिने सध्याचा पत्ता सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड येथे मा.बालकल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने दाखल केले आहे. बालिकेचा रंग काळा सावळा असून डाव्या गालावर तीळ आहे. चि. स्वदेश विदेश उपाध्याय जन्म दिनांक ०१/०५/२०१७ वय ०८ वर्ष ०३ महिने सध्याचा पत्ता शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. येथे मा.बालकल्याण समिती, बीड यांच्या आदेशाने दाखल केले आहे. बालक रंगाने काळा सावळा असून डाव्या डोळ्यावर तीळ आहे. बालकाचा फोटो व बातमी प्रसारीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी,बीड, मा.बालकल्याण समिती, बीड व शांतीवन मुलांचे बालगृह, आर्वी, जि. बीड. व सुलभा सुरेश जोशी शिशुगृह आर्वी,जि. बीड आणि शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. तसेच संस्थेच्या पत्यावर अथवा अधीक्षक- मो. क्र.९९२३७७२६९४, ९४२१२८२३५९ फोनवर संपर्क करावा अन्यथा बालकल्याण समिती बालकाबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेतील. मुदत संपल्यानंतर कोणताही दावा अथवा हक्क मा. बालकल्याण समिती बीड ग्राह्य धरणार नाही. असे बालकल्याण समितीने प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# वाळूमाफियांवर जिल्हाधिकारी पाठक यांची धडाकेबाज कारवाई; तब्बल चौदा कोटींचा दंड!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात माजलेल्या वाळू माफिया च्या दादागिरीला चाप लावण्यासाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी धडाकेबाज कारवाईस सुरवात केली आहे. अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करणाऱ्या पाच हयावा च्या मालकांना नोटीस पाठवत तब्बल चौदा कोटी रुपयांचा दंड ठोठवला आहे. पाठक यांनी वाळू माफिया च्या मुसक्या आवळण्यास सुरवात केल्याने खळबळ उडाली आहे. त्यासोबतच पाठक यांनी महसूल मधील भ्रष्ट तलाठी, मंडळ अधिकारी यांच्यावर नीलम्बनाचे अस्त्र उगारल्याने भ्रष्टाचार करणाऱ्यांना धडकी भरली आहे.बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शस्त्र परवाने असोत कि बियर बार परवाने अथवा अवैध वाळू उपसा या विरोधात मोहीम उघडली आहे.



गोदावरी पट्यात म्हणजेच गेवराई तालुक्यात गोदावरी नदीतून आणि सिंदफना नदीतून वाळू उपसा करून माजावर आलेल्या वाळू माफियाना दणका देण्यासाठी जिल्हाधिकारी पाठक यांनी पाडळसिंगी टोलनाक्यावरील फुटेज चा आधार घेतला आहे अशी माहिती त्यांनी न्यूज अँड व्यूज ला दिली. दोन दिवसापूर्वी पाठक यांनी गोकुळ किसन गायकवाड या हयावा मालकाला सात कोटी रुपयांचा दंड ठोठवला होता. एकीकडे स्वतः जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे कोट्यावधी रुपयांचा दंड करण्याची कारवाई करत असताना गेवराईचे तहसीलदार खोमणे मात्र हातावर हात ठेवून मूग गिळून का गप्प आहेत, त्यांचेही वाळू माफियासोबत काही लागेबंधे आहेत का याची चौकशी करण्याची मगणी होतं आहे. बुधवारी त्यांनी समीर बाबुलाल शेख रा आहेर वाहेगाव याने दीड महिन्यात १०५ ट्रिप वाळू उपसा केला त्याला तीन कोटी दहा लाख ४९ हजार रुपये दंड केला आहे. न्यूज अँड व्यूज. तर रिजवान बशीर शेख रा हिरापूर याने दीड महिन्यात १९२ ट्रिप केल्याने पाच कोटी, ३६ लाख २७ हजार, ईश्वर शिवनाथ सुखदेव रा म्हाळस पिंपळगाव याने ३९ ट्रिप केल्याने १ कोटी ३९ लाख दंड,न्यूज अँड व्यूज,गजानन भारत मुगूटराव रा बाग पिंपळगाव याने ९२ ट्रिप केल्याने दोन कोटी ७६ लाख तसेच अब्दुल बशीर अब्दुल सत्तर रा मोमीनपुरा याने ६६ ट्रिप केल्या, त्यामुळे या मालकाला दोन कोटी नऊ लाख रुपये दंड केला आहे. पाठक यांनी या पाच वाहन मालकांना तब्बल चौदा कोटी पेक्षा अधिक दंड केल्याने खळबळ उडाली आहे. पाठक यांनी वाळू माफिया विरोधात कारवाई सुरु केल्याने गेवराई सह जिल्ह्यातील वाळू माफिया अंडर ग्राउंड झाले आहेत. गेल्या काही दिवसात जालना रोडवर एकही हयावा दिसत नसल्याचे चित्र आहे. वाळू माफियाना महसूल आणि पोलीस प्रशासनाचे सहकार्य असल्याचे अनेकवेळा उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे अनेक महसूल आणि पोलीस कर्मचारी यांची या धंद्यात पार्टनरशिप असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गेवराई तालुक्यातील गोदावरी पट्यात नोकरीस असलेले मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस निरीक्षक, शिपाई, बिट अंमलदार हे या कारवाईने संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.



## तेराव्या राष्ट्रीय गुरु अबॅकस लेवल स्पर्धेत विद्यार्थ्यांचे यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**पुणे येथे झालेल्या तेराव्या राष्ट्रीय गुरु अबॅकस स्पर्धा २०२५ मध्ये अंबाजोगाई शहरातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले असून या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये मास्टर ऑफ अबॅकस डिग्री प्राप्त अथर्व टेकाळे,रुद्र पाथरकर, सिद्धी सोळंके प्रतिक राऊत, पृथ्वीराज देशमुख ,प्रसाद साबळे, गणेश शेप, अयान शेख,,हमदान विद्यार्थी असून त्यांनी अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध अशा गुरु अबॅकस या ठिकाणी त्यांच्या मार्गदर्शिका वैशाली कुलकर्णी (पुसकर) यांच्याकडून अबॅकस चे प्रशिक्षण घेतलेले आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या गुरु अबॅकसच्या संचालिका वैशाली कुलकर्णी(पुसकर )यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## पो.कॉ.अनंत इंगळे यांची गळफास घेऊन आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेले पो कॉ अनंत इंगळे यांनी काल रात्री मुख्यालया मधेच गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आज सकाळी निदर्शनास आल्याने पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे. अनंत इंगळे हे काही काळ अंबाजोगाई, परळी या ठिकाणी कार्यरत होते. मागील काही महिन्या पासून ते बीड मुख्यालयात कार्यरत असून काल रात्री ड्युटी वर असतानाच इंगळे यांनी आज पहाटे गळफास घेउन आपली जीवन यात्रा संपवली.

इंगळे यांनी अशाप्रकारे आपल्या आयुष्याचा शेवट का केला? त्यांच्या आत्महत्येमागं नेमकं कारण काय? याची माहिती अद्याप समोर आली नाही. इंगळे यांनी आत्महत्या केल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आली आहे. पोलीस घटनास्थळाचा पंचनामा करत आहेत. कर्तव्यावर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याने अशाप्रकारे आत्महत्या केल्यानं बीडच्या पोलीस प्रशासनात खळबळ उडाली असून आत्महत्येच्या कारणाचा शोध घेतला जात आसुन अनंत इंगळे यांना दारूचे भयान व्यसन जडलेले होते, दारूच्या नशेत तर याने हे टोकाचे पाऊल उचलले की काय असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

## ५० हजाराची लाच घेताना लाचखोर पकडला!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील लाचखोरी कमी होण्याचे नाव घेत नाही. दिवसेंदिवस लाचखोर एसीबीच्या जाळ्यात अडकले जात आहे. बीडच्या शिक्षण विभागातील (माध्यमिक) वरिष्ठ लिपिक संतोष कुडके यास ५० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सेवानिवृत्त मुख्याध्यापकाचे सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यासाठी फाईल पुढे पाठवण्यासाठी ९० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यातील पहिला टप्पा म्हणून ४० हजार रुपये घेतले होते. त्यानंतर दुसरा टप्पा ५० हजार रुपये घेताना ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीमने केली. या कारवाईने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

## बारा जानेवारीला राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचा नामकरण सोहळा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**धारूर शहरातील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालय असे नामकरण करण्यास यूजीसी कडून मान्यता मिळाली आहे त्या अनुषंगाने दिनांक १२ जानेवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नामकरण सोहळा आयोजित केला आहे.**

कै.रामरावजी आवरगावकर यांनी ग्रामीण भागातील निघणार त्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी या उदात्त भावनेतून एका छोट्याशा ऑइल मिलच्या जागेत सुरू केलेल्या



महाविद्यालयाचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे महाविद्यालया तून अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन विविध शासकीय पदे भूषवली आहेत तसेच सुशिक्षित पिढ्या निर्माण करण्याची मोठे काम या महाविद्यालयाच्या माध्यमातून झाले आहे अशा महाविद्यालयाला स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ महाविद्यालय असे नाव दिले गेले आहे.

राजमाता जिजाऊ यांच्या जयंती दिनी म्हणजे १२ जानेवारी रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व आमदार प्रकाश सोळंके, इंद्रजीत नारायण भालेराव सतीश भाऊ चव्हाण सरचिटणीस मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ व अमरसिंह पंडित उपाध्यक्ष मशिप्र, किरण आवरगावकर ,जयसिंह सोळंके, इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नामकरण सोहळा संपन्न होणार आहे या कार्यक्रमास शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी केले आहे.

## धारूरची डॉ. योगेश्वरी विलास शिंदे हिचे स्त्रीरोग आणि प्रस्तुती शास्त्र परीक्षेत यश

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**



धारूर येथील डॉक्टर योगेश्वरी विलास शिंदे हिने एमबीबीएस ची पदवी मिळवल्यानंतर स्त्रीरोग आणि प्रस्तुतीतज्ञ या शिक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संत मुक्ताबाई हॉस्पिटल घाटकोपर या ठिकाणी दाखला घेतला होता त्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये कॉलेज ऑफ फिजिशियन आणि सर्जन मुंबई यांच्याकडून घेण्यात आलेल्या स्त्रीरोग आणि प्रस्तुतीतज्ञ (डी.जि.ओ) परीक्षेत डॉ. योगेश्वरी शिंदे हिने यश संपादन केले असून या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

धारूर शहरातील डॉक्टर योगेश शिंदे हिने बॅचलर ऑफ मेडिसिन आणि बॅचलर ऑफ सर्जरी पदवीचे पाच वर्षाचे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथून मेहनत पूर्ण अभ्यासाच्या जोरावर पूर्ण केल्यानंतर स्त्रीरोग आणि प्रस्तुतीतज्ञ या शिक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संत मुक्ताबाई हॉस्पिटल घाटकोपर या ठिकाणी दाखला घेतला होता या शिक्षणासाठी देखील डॉ. योगेश्वरीने चांगला अभ्यास केला होता या केलेल्या अभ्यासाचा मोबदला म्हणून सप्टेंबर २०२४ मध्ये कॉलेज ऑफ फिजिशियन आणि सर्जन मुंबई यांच्याकडून घेण्यात आलेल्या स्त्रीरोग आणि प्रस्तुतीतज्ञ (डी.जि.ओ) या परीक्षेत डॉ. योगेश्वरी शिंदे हिला घवघवीत यश संपादन करता आले आहे तिच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉक्टर योगेश्वरी शिंदे ही सध्या धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्ण सेवा देत आहे.

## कडा आष्टी आणि परिसरातील बी सेवा पूर्ण क्षमतेने मिळण्यासाठी नविन टॉवरची निर्मिती करा-शंकर देशमुख

**आष्टी । प्रतिनिधी**

**कडा, आष्टी आणि परिसरातील बीएसएनएल मोबाईलची सेवा पूर्ण क्षमतेने मिळण्यासाठी नविन टॉवरची निर्मिती करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री शंकर देशमुख यांनी केली आहे.**

भारतीय दूरसंचार निगम प्रायव्हेट लिमिटेडचे महाप्रबंधक श्री राजेंद्र चौंगड यांची अहिल्यानगर येथे भेट घेऊन श्री



देशमुख यांनी आष्टी तालुक्यात बीएसएनएल मोबाईल सेवेची रेंजचा पूर्ण बोजवारा उडाला असुन दिवस दिवस रेंज नसते त्या मुळे कडा आष्टी परिसरातील बीएसएनएलचे

### लवकरच मोबाईल सेवा सुरुळीत होईल

अहिल्यानगर संचार निगमचे महाप्रबंधक राजेंद्रसिंह चोंगाड हे शंकर देशमुख यांचेशी संवाद साधताना म्हणाले की, नेटवर्क संदर्भात ज्या काही तांत्रिक अडचणी असतील त्या लवकरच दूर करुन आष्टीकरांना सुरुळीत मोबाईल सेवा देण्याण्याबाबत त्यांनी आश्ववस्त केले.

## अंभोरा पोलीस स्टेशन अंतर्गत शिकवले जाते शाळेत कायद्याचे धडे

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन विशेष नवनवीन मोहिमेतून नेहमीच चर्चेत आढळून येत आहे अवैध धंदे,दारु बंदी, बेकायदेशीर दारु विक्री अशा धाडसत्राने नेहमीच अंभोरा पोलीस स्टेशन अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत अन्? याच सत्कार यामुळे टेशन व अंभोरा पोलीस स्टेशनचे एपीआय मंगेश साळवे व त्यांची सर्व टिक सिंगम चर्चा विषय ठरत आहे

आज दि.७जानेवारी रोजी पोलीस स्टेशन अंभोरा येथील



पोलीस अंमलदार शिवदास केदार,अमोल शिरसाट यांनी मौजे कारखेल खुर्द येथील अडबंगीनाथ विद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना पोक्सो कायद्यासंदर्भाने, तसेच सुरक्षिततेच्या संदर्भाने घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले.

व सर्व शालेय विद्यार्थ्यांना कायदा समजून सांगात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली गेली.

## वारसदार नसताना मुख्याधिकाऱ्यानी लावले पि.टी.आर रेकॉर्डला नाव

### मुख्याधिकाऱ्यांच्या विरोधात नगरपालिकेसमोर उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जुन्या मोंढ्यामध्ये असलेल्या करोडो रुपयांच्या ५ दुकानांना वारसदार नसताना येथील नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संगणमत करून नाव लावण्याचा प्रकार उघड झाला आहे. विशेष म्हणजे रजिस्टर्ड मृत्युपत्राद्वारे भावाचे लावले असताना व भावाच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीचे नाव या जागेला नाव लावणे आवश्यक होती परंतु तसे न केल्यामुळे व मुख्याधिकाऱ्यांकडून लावलेले नाव पीटीआर वरून कमी करण्यास टाळाटाळ केल्यामुळे नातेवाईकांनी नगरपालिकेसमोर दि ०८ जानेवारी बुधवार रोजी पासून उपोषण सुरू केले आहे.

राजाराम धोंडीराम जोगडे यांची येथील जुन्या मोंढ्यात १०-११८/६ - ३३४ /१ या मिळकतीची ६० बाय ३० स्क्वेअर फुट जागा होती. त्यांना मुलबाळ नसल्यामुळे त्यांनी त्यांचे बंधू निवृत्ती धोंडीराम जोगडे यांच्या नावे २५ नोव्हेंबर २०१३ साली ४५१३/२०१३ मध्ये रजिस्टर्ड मृत्युपत्र

बनवून त्यांना वारसदार केले होते. राजाराम जोगडे यांचा मृत्यू २४ मे २०२१ मध्ये झाला. तर त्यांचे बंधू निवृत्ती जोगडे यांचा मृत्यू २९ मे २०२१ साली झाला होता. दोन्ही भावाचा मृत्यू झाल्यानंतर व रजिस्टर्ड मृत्यू पत्राआधारे राजाराम जोगडे यांचे बंधू निवृत्ती जोगडे यांचे नाव सदर जागेला नाव लावने



आवश्यक होते. त्यानुसार येथील नगरपालिके मध्ये १९ जुलै २०२१ निवृत्ती जोगडे यांचे नाव सदरील जागेला ◀◀ पान ३ वर

## अखेर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदतनिधी वाटप

### विभागीय आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश, डॉ.ढवळेंच्या तक्रारीची दखल

**बीड । प्रतिनिधी**

**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांस मदत म्हणून १ लाख रुपये मदत दिली जाते.त्यातील ७०,००० रूपयांची बँकेत एफडी केली जाते तर उर्वरित ३०,००० रूपये कुटुंबियांच्या कामी येतात.**



त्यातही शासनाकडून आणि जिल्हा प्रशासनाकडून १ लाख रुपयांची मिळणारी मदत उशिराने दिली जात असेल तर मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांचा एक प्रकारे छळच म्हणावा लागेल.बीड जिल्ह्यातील मागील वर्षी १ जानेवारी २०२४ ते १ नोव्हेंबर २०२४ या ११ महिन्यात १७४ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची प्रकरणे शासन दरबारी नोंद असून मात्र मदत केवळ ६५ शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मिळाली असून उर्वरित शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना तातडीने मदतनिधी मिळावा तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार १५ दिवसात मदत मिळणे बंधनकारक असताना मदत मिळण्यास हलगर्जीपणा करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना प्रकरणात प्रशासकीय कारवाई करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन विभागीय आयुक्तांना दिल्यानंतर याची दखल घेत नयना बोंदार्डे अपर आयुक्त (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दि. २०.१२.२०२४ रोजी तातडीने संबंधित प्रकरणी निवेदनात नमूद केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही ◀◀ पान ३ वर

## पुरस्कारांची थाप कर्मचाऱ्यांना प्रेरणा देते उत्तम संवादाने समाजाशी नाळ जुळते-एस.एन. मेश्राम

**बीड । प्रतिनिधी**

शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर आपण शासनाचे काम करत असतांना विविध अधिकारी, कर्मचारी,नागरिकांशी विविध प्रकारातील कामातुन नाळ जोडली जाते. मग ते कार्यातील विविध क्षेत्रे असतील किंवा शैक्षणिक, सामाजिक क्षेत्र असेल. कर्मचारी, शिक्षक हे तनामनाने काम करतात आणि त्याची आपल्याला पावती मिळावी अशी त्यांची कधीच अपेक्षा नसते पण जे काम उत्कृष्ट असेल त्याची दखल घेऊन त्याची



पावती निश्चितच मिळते आणि हीच पुरस्काराची थाप इत्तरानाही प्रेरणा देते असे गौरोवोद्गार दिव्यांग विभाग यांच्यावतीने आयोजित दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक,कला शिक्षक, शिक्षिकेतर कर्मचारी याच्या जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळयात, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी एस.एन मेश्राम यांनी आज महाराष्ट्र शासन जिल्हा समाज कल्याण, जिल्हा परिषद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात काढले. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे, आपल्या चांगल्या वर्तनामधून, उत्तम संस्कारातुन, सेवाभावी वृत्तीने साधलेल्या संवादातून समाजाशी आपुलकीचे नाते

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शाळा सुरक्षित आहेत की नाही? मुलींचे कपडे बदलतानाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग; शिपायाला अटक

पुणे: पुण्यातील पाषाण भागातील एका नामांकित शाळेच्या चेंजिग रूममध्ये मोबाईल ठेवून कपडे बदलतानाचे रेकॉर्डिंग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शाळेतील शिपायाने हा प्रकार केला असून, त्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेने शहरात संतापाची लाट पसरली आहे. याप्रकरणी पोलिसांनी शिपाई तुषार सरोदे (वय २९) याला अटक केली आहे. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांत पोक्सो सह बी.एन.एस कलम ७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, पाषाण परिसरात ही इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. तुषार त्याठिकाणी शिपाई आहे. ६ जानेवारी रोजी खेळाचा तास संपल्यानंतर विद्यार्थिनी किचन रूममध्ये ड्रेस चेंज करायला गेल्या. तिथे शाळेतील शिपाई सरोदे उभा होता. विद्यार्थीनींनी त्याला तिथून जायला सांगितले, तो गेला परंतु, त्याने मोबाईल तिथेच ठेवून त्याचे रेकॉर्डिंग सुरू केले. मोबाईल देखील त्याने एका स्विच बोर्डवर ठेवला होता.

परंतु, काही वेळातच विद्यार्थिनींच्या हा प्रकार लक्षात आला. तात्काळ त्यांनी मोबाईल ताब्यात घेऊन त्यातून व्हिडीओ डिलीट केला. घडलेला संपूर्ण प्रकार विद्यार्थीनींनी त्यांच्या पालकांना सांगितला. पालकांनी शाळेतील मुख्यधापिका यांची भेट घेऊन घटनेबाबत माहिती दिली. सरोदेला विचारले असता त्याने या प्रकरणाला नकार दिला, मात्र हा प्रकार जेव्हा शाळेच्या व्यवस्थापनाला कळला तेव्हा त्यांनी पुन्हा एकदा सरोदेकडे चौकशी केली. त्याने त्याने कबूली दिली. नंतर शाळेच्या व्याव्यस्थापन ने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर तात्काळ पोलिसांनी गुन्हा दाखल करत सरोदेला अटक केली.

**पोलिस पाटलाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग**

सिंदेवाही तालुक्यातील देवाडा येथील पोलिस पाटलाने अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी (दि.५) घडली. अल्पवयीन मुलीने आपल्या वडिलासह पोलिस स्टेशन गाठत तक्रार दिली असून, यातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. मुकेश काशीनाथ पेटकुले (२८ रा. देवाडा) असे आरोपी पोलिस पाटलाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी (दि.५) अल्पवयीन मुलगी शाळेचा कार्यक्रम असल्याने गावातील तिची वर्गमैत्रीण मिळून सकाळी कार्यक्रमाला हजर झाले होते. दुपारी तीनच्या सुमारास शाळेचा कार्यक्रम संपन्न झाल्याने दोघेही सिंदेवाही येथून बसने देवाडाकरिता निघाले. देवाडा गावच्या बसस्थानकावर उतरल्यानंतर काही वेळात मुलींना गावातील पोलिस पाटील मुकेश पेटकुले याने आपल्या दुचाकीने आल्याचे दिसले. बस स्थानकापासून गाव काही अंतरावर असल्याने मुलींनी पोलिस पाटील पेटकुले याच्यावर विश्वास ठेऊन गावात सोडून द्यावे, अशी विनंती केली.

पेटकुले याने होय सोडून देतो म्हणून दोन्ही मुलींना आपल्या दुचाकीवर बसवले. फिर्यादी मुलीला सिंदेवाहीला घेऊन जातो आणि तिच्या वर्गमैत्रीणींना बसस्थानकावर ठेवतो, असे बोलू लागल्याने फिर्यादी मुलीने येण्यास नकार दिला. तरीसुद्धा आरोपी पेटकुले आग्रह करत होता. काही अंतरावर दोन्ही मुलींनी पेटकुले याला दुचाकी थांबविण्यास सांगितले आणि दोन्ही मुली दुचाकीवरुन उतरून पायी-पायी गावाच्या दिशेने निघाल्या.

# काम करताना शिडीवरुन पडून वायरमनचा मृत्यू; पोलिसांकडून ठेकेदारावर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या टेरेसवर इलेक्ट्रिकचे (लाईट) काम करताना शिडीवरून खाली पडल्याने कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. वडगाव शेरी येथील सैनीकवाडीमधील वृद्धावन नगर येथे ही घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे. युसूफ शेख (वय ४७, रा. कोंढवा) असे मृत्यू झालेल्या कामगाराचे नाव आहे. याप्रकरणी इलेक्ट्रिक्स ठेकेदारावर येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत युसूफ यांच्या पत्नीने तक्रार दिली आहे. ४ जानेवारी दुपारी ही घटना घडली आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, युसूफ शेख हे लाईट फिटींगचे काम करतात. दरम्यान, वृद्धावन नगर येथे नवीन बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर लाईटचे काम सुरू होते. हे काम युसूफ शेख यांच्याकडून करून घेतले जात होते. ठेकेदाराने त्याचे कॉन्ट्रॅक्ट घेतले होते. मात्र, काम करताना कामगारांच्या सुरक्षिततेची पुरेषी काळजी घेतली गेली नाही. युसूफ हे शिडीवर उभा राहून काम करत असताना ते शिडीवरून खाली पडले. यात डोक्याच्या पाठिमागील बाजूस गंभीर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. ठेकेदाराने कामगारांच्या जिवीताची व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून योग्य ती साधने न पुरविता त्यांच्याकडून कामकरून घेतले. काम करताना त्यांचा शिडीवरून खाली पडून मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूला ठेकेदार जबाबदार असल्याने याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास येरवडा पोलीस करत आहेत.

# टेकड्यांवर लुटमार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; डेक्कन पोलिसांची मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

शहरात टेकड्यांवर फिरण्यासाठी गेलेल्यांवर नागरिकांच्या लटुमारीच्या घटनां गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वाढल्या होत्या. टेकड्यांवर फिरायला जाणाऱ्या नागरिकांनी अनेकदा तक्रारीही केल्या होत्या. अखेर नागरिकांची लुटमार लुटमार करणाऱ्य टोळीचा पर्दाफाश डेक्कन पोलिसांना यशस्वीपणे केला आहे. या टोळीकडून चार गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून, विशेष म्हणजे, कोयता घेऊन लुटमारी करणाऱ्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे.



स्वप्नील शिवाजी डोंबे (वय ३२, जनता वसाहत) आणि अनिकेत अनिल स्वामी (वय २५) असून, त्यातल्या एका आरोपी मोंटी उर्फ तेजस खराडे (वय २५) ला पोलिसांनी गस्तीदरम्यान ताब्यात घेतले आहे. हे तिघेही सराईत गुन्हेगार असून, आणखी गुन्हे करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत तपास सुरू आहे, अशी माहिती परिमंडळ एकचे उपायुक्त संदिपसिंह गिल्ल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**विद्यार्थिनींचा पाठलाग करून फोटो काढणाऱ्या 'त्या' दोघांना अटक; पोलिसांची चौकशी सुरु**

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस उपनिरीक्षक महेश भोसले, अजय भोसले, दत्तात्रय सावंत, राजेंद्र मारणे, धनश्री सुपेकर, सागर घाडगे आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली. शहरातील टेकड्यांवर सायंकाळी आणि मॉर्निंग वॉकसाठी नागरिक, तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणावर जातात. मात्र, हीच संधी साधून या ठिकाणी हे तिघे नागरिकांची लुटमारी करत होते, दोन दिवसांपूर्वी हनुमान टेकडीवर १७ वर्षांच्या महाविद्यालयीन मुलीला आणि तिच्या मित्राला लुटले होते. त्यानंतर या कारवाईला वेग आला. गुन्ह्याचा तपास वरिष्ठ निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. यावेळी पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण केले. त्यानुसार आरोपींची दुचाकी तपासल्या गेली आणि स्वप्नील डोंबे व अनिकेत स्वामी यांचा संशयीत संपर्क समोर आला. त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपासात हेही समोर आले की, त्यांच्यावर गेल्या वर्षी हनुमान टेकडीवरील आणखी एक लुटमारी करण्याचा आरोप आहे. डेक्कन पोलिसांकडून दोन्ही आरोपींच्या ताब्यातून दोन लाखांहून अधिक रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. यासोबतच त्यांच्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल आहेत.

# ज्येष्ठ महिलेची फसवणूक; केअरटेकर महिलेला बेड्या, साडेआठ लाखांचे दागिने जप्त

पुणे । प्रतिनिधी

जेष्ठ महिलेचा सांभाळ करण्यासाठी ठेवलेल्या एका केअरटेकर महिलेनेच दागिने चोरून पोबारा केल्यानंतर या महिलेला बिबवेवाडी पोलिसांनी सापळा रचून अटक केली. तिच्याकडून ८ लाख ७० हजार रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली. गायत्री सुनील हातेकर (वय २४, रा. चव्हाणनगर, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.



नोव्हेंबर महिन्यात ही घटना घडली होती. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शंकर साळुंखे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मनोजकुमार लोंढे, सहायक निरीक्षक संजय निकुंभ, उपनिरीक्षक शशांक जाधव, आशिष गायकवाड, राहुल शेलार, नितीन कातुर्डे, गोकुळा काटकर यांनी ही कामगिरी केली.

तक्रारदार महिलेची आई बिबवेवाडी भागात राहायला आहेत. त्यांच्या बंगल्यातून २५ तोळे दागिने चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. नोव्हेंबर महिन्यात ही घटना घडली होती. पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत होता. तक्रारदार महिलेच्या घरी आईसाठी केअरटेकर म्हणून या महिलेला ठेवले होते. दरम्यान तिने कोणाचे लक्ष नसल्याची संधी साधून कपाटातून दागिने चोरले होते. तपास करत असताना उपनिरीक्षक शशांक जाधव यांना याबाबतची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत तिने दागिने चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या दागिन्यांपैकी साडेआठ लाख रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे.

**ज्येष्ठ महिलेचे पावणेचार लाखांचे मंगळसूत्र चोरले**

विवाह समारंभासाठी निघालेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना एरंडवणे भागातील डीपी रस्त्यावर घडली. याप्रकरणी अलंकार पोलीस ठाण्यात दुचाकीस्वार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नांदेड सिटीत राहायला आहेत. रविवारी (५ डिसेंबर) त्यांच्या नात्यातील एकाचा डीपी रस्त्यावरील मंगल कार्यालयात विवाह होता. महिला आणि त्यांचे पती रात्री सव्वा आठच्या सुमारास डीपी रस्त्याने निघाले होते. त्यावेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील पावणेचार लाख रुपयांचे मंगळसूत्र चोरले. महिलेने आरडाओरडा केला. दुचाकीवरील चोरटे भरधाव वेगात पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक गोरक्ष घोडके तपास करत आहेत.

# पत्नी, सासूच्या त्रासाला कंटाळून युवकाने उचलले टोकाचे पाऊल

पुणे । प्रतिनिधी

पत्नी, सासू आणि मेहुणीच्या त्रासाला कंटाळून ३२ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रफुल्ल हरिश्चंद्र कदम असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. पुण्यातील विश्रांतवाडी परिसरात हा प्रकार घडला. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त करण्याच्या आरोपावरून पोलिसांनी प्रफुल्लची पत्नी, सासू आणि मेहुणीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



प्रफुल्ल कदमच्या वडील, हरिश्चंद्र गोविंद कदम (वय ६०), यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हरिश्चंद्र कदम यांच्या तक्रारीनुसार, प्रफुल्लची पत्नी, सासू आणि मेहुणी गेल्या काही दिवसांपासून प्रफुल्लला मानसिक त्रास देत होते. तुम्ही आम्हाला फसवले, तू मेला तर मी दुसरे लग्न करून सुखी राहील, असंही ते म्हणत होते. या सर्व त्रासाला कंटाळून प्रफुल्लने ३१ डिसेंबरला घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहिली होती, ज्यात पत्नी, सासू आणि मेहुणीच्या छळामुळे आत्महत्या करत असल्याचे नमूद केले होते. पोलिसांनी प्रफुल्लच्या कुटुंबीयांची तक्रार स्वीकारली असून, पोलीस उपनिरीक्षक पद्मराज गंपले यांचा तपास सुरू आहे. विश्रांतवाडी पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# अतिक्रमणविरोधी पथकाला धक्काबुक्की; चौघांविरुद्ध गुन्हा

पुणे : नामदार गोपाळ कृष्ण गोखले पथ (फर्गसन रस्ता) परिसरातील पदपथावर बेकायदा पथारीवाल्यांविरुद्ध कारवाई करणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकाला धक्काबुक्की केल्याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोमवारी सायंकाळी फर्गसन रस्त्यावरील सागर आर्केड परिसरात ही कारवाई केली होती.

याप्रकरणी महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचारी सचिन घेंगे (२९, रा. मांजरी) यांनी डेक्कन पोलिसांत फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फर्गसन रस्त्यावरील पदपथावर बेकायदा पथारी थाटून फेरीवाल्यांकडून बेकायदा व्यवसाय केला जातो. पादचाऱ्यांना पदपथावरून चालताही येत नसल्याच्या महापालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या.या पार्श्वभूमीवर अतिक्रमण विभागाकडून बेकायदा पथारी व्यावसायिक, फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आहे. सोमवारी सायंकाळी फर्गसन रस्त्यावरील सागर आर्केड परिसरात फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करण्यात येत होती. त्या वेळी महिलेसह चौघांनी अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा सुरु

पुणे । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा दि. ७ जानेवारीपासून सुरू होणार आहेत. ही परीक्षा २३ जानेवारीपर्यंत असणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या हिवाळी सत्रातील प्रवेशित नियमित विद्यार्थांची सत्र परीक्षा व मे २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची ही परीक्षा घेतली जाणार आहे.

महाराष्ट्र भरातून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यास केंद्रावर प्रवेश घेतलेले जवळपास एक लाख ९ हजार २३७ विद्यार्थी ही परीक्षा देतील. राज्यातील विविध २३५ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जाणार आहे.

परीक्षेसंदर्भातील आवश्यक ती सर्व शैक्षणिक व प्रशासकीय तयारी विद्यापीठातर्फे पूर्ण करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी मदत यंत्रणाही कार्यरत करण्यात आलेली आहे. काही समस्या उद्भवल्यास विद्यार्थ्यी विद्यापीठ मदत केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

परीक्षा आयोजनाच्या सर्व मार्गदर्शक सूचना विभागीय केंद्रांमार्फत परीक्षा केंद्रांना देण्यात आलेल्या आहेत. पोर्टलवरच विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या या परीक्षा सुरू होत आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाकडून आवश्यक ती काळजी घेतली जाणार असल्याची माहिती परीक्षा नियंत्रक विभागाने दिली आहे.

# कोथरूडमध्ये रस्त्याच्या अर्धवट कामामुळे वाहन चालकांना त्रास; राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आयुक्तांना निवेदन

पुणे : कोथरूड भागातील विविध चौकामध्ये रस्त्याचे काम चालू आहे. काही ठिकाणी रस्ते खोदले आहेत तर काही ठिकाणी रस्त्याला खोदून लाईन मारल्यामुळे तेथे अनेक नागरिक व महिला गाडी घसरून छोटे मोठे अपघात होत आहेत. तसेच कोथरूड भागातील रस्त्यांच्या अर्धवट कामामुळे मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक होत आहेत. याच संदर्भात आज राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कोथरूड विधानसभेचे अध्यक्ष गिरीश गुरनानी यांनी कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयचे अति. आयुक्त विजय नाईकलं यांची भेट घेऊन निवेदन दिले तसेच रस्त्याच्या अर्धवट कामांवर तात्काळ लक्ष घालून रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण



करून नागरिकांना होणाऱ्या नाहक त्रासामधून मुक्त करावे अशी मागणी केली. मागणी मान्य नाही झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही गुरनानी यांनी प्रशासनाला दिला.

पूणे महानगर पालिका आणि ट्राफिक पोलीस मध्ये ताळ मेळ साधून मीटिंग होणे ही अत्यंत आवश्यक आहे जेणेकरून रस्त्याच्या अर्धवट कामामुळे होणाऱ्या ट्रॅफिक नियंत्रात आणता येईल असंही युवक अध्यक्ष गिरीश गुरनानी यांनी निवेदनातून म्हणाले. यावेळी युवक पदाधिकारी अमोल गायकवाड आणि अमित भगत उपस्थित होते.

**शहरात उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकार सुरूच**

एकीकडे शहरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई वाढली असल्याचा दावा महापालिका प्रशासन करीत असले तरी, उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रकार सुरु आहे. महापालिकेने दंडात्मक कारवाईचा इशारा दिलेल्या फलकासमोरच कचरा टाकण्यात येत असल्याचे चित्र शहरात दिसत आहे. शहर स्वच्छ करण्यासाठी महापालिकेच्या घन कचरा विभागाकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश येत असले तरी अद्यापही नागरीकांकडून उघड्यावर कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होत नाही.

# शरद पवार हे औचित्य गमावलेले नेते - भाऊ तोरसेकर यांचे मत

पुणे : व्यक्ती कुठल्याही क्षेत्रात कार्यरत असो, बदलत्या काळाची चाहूल आणि गरज तिने ओळखली पाहिजे. बदल स्वीकारले पाहिजेत. स्वतःमध्ये, वैचारिक मांडणीमध्ये आणि कार्यपद्धतीत काळानुरूप गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत. सद्यकाळाशी निगडीत राहणे जमवले पाहिजे. विशेषतः राजकीय कारकीर्द करणाऱ्यांनी हे विशेष जपले पाहिजे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी हे बदल स्वीकारले नाहीत. नव्या पिढीला योग्य वेळी जागा दिली नाही, त्यामुळेच पवार आता औचित्य गमावलेले नेते वाटतात, असे मत ज्येष्ठ पत्रकार, संपादक आणि राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर यांनी व्यक्त केले.

मनमोकळ्या गप्पा या कार्यक्रमात प्रसिद्ध लेखक अभिजीत जोग यांनी त्यांच्याशी संवाद साधला. तोरसेकर यांचा सत्कार सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय




राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आला. नॅशनल बुक ट्रस्टचे विश्वस्त राजेश पांडे, प्रांतपाल शितल शहा, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे, संमेलनाचे कार्याध्यक्ष राजीव बर्वे उपस्थित होते.

तोरसेकर यांनी यावेळी राज्यातील राजकीय परिस्थिती, लोकसभा, विधानसभा निवडणुक, प्रमुख राजकीय पक्षांचे यशापयश आणि भावी दिशा, अशा मुद्द्यांवर भाष्य केले. शरद पवार स्वतः युवक काँग्रेसचे नेते म्हणून ६७ साली प्रथम आमदार झाले. पण केंद्रीय मंत्रीपद वगळता पवार यांची कारकीर्द सर्वव्यापक होऊ शकली नाही. खुद्द महाराष्ट्रातही ठराविक ५ जिल्हे वगळता त्यांचा प्रभाव दिसू शकला नाही. ताज्या निवडणुकीत तर त्यांचे वर्चस्व असणाऱ्या जिल्ह्यांतूनही मतदारांनी त्यांना पराभूत केले. ज्यांना स्वतःचे औचित्य राखता येत नाही, ते अस्तंगत होतात. ज्यांना स्वतःचा अस्त कळत नाही, त्यांना लोकशाहीत मतदार बाजूला सारतात. पवार यांचे सध्याचे वक्तव्य पाहिले तर ते केविलवाणे वाटतात आणि त्यांच्या या अस्ताला ते स्वतःच जबाबदार आहेत, असे तोरसेकर म्हणाले.

राजकारणात संयम ठेवावा लागतो, अभ्यास करावा लागतो, हे देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या वागण्यातून दाखवून दिले. सर्वाधिक आमदार असूनही विरोधी बाकावर बसलेल्या संयमी देवेंद्र यांनी पवारांचा पक्ष फोडून, आपला मुत्सद्दीपणा दाखवून दिला आणि राजकीय खेळाचे नियम बदलले आहेत, हेही सिद्ध केले. पक्ष म्हणून लोकसभेतील चुका भाजपने दुरुस्त केल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीही पक्षाने सर्व पातळ्यांवर तयारी केली, पण शांतपणे आणि संयम बाळगून. रोज पत्रकार परिषदा घेऊन उच्चरवात ते काहीही सांगत फिरत नाहीत, हा फरक पुरेसा बोलका आहे, असेही तोरसेकर म्हणाले. मोहोळ यांचेही भाषण झाले. बर्वे यांनी आभार मानले. स्मिता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.